आवृत्ती -२

सत्यमेव जयते

# मतमोजणी प्रतिनिधींसाठी निदेशपुस्तक २०२३

भारत निवडणूक आयोग
निर्वाचन सदन, अशोक रोड, नवी दिल्ली ११० ००१

“ मजबूत लोकशाहीसाठी व्यापक सहभाग ”

सत्यमेव जयते

# मतमोजणी प्रतिनिधींसाठी निदेशपुस्तक, २०२३

भारत निर्वाचन आयोग

ELECTION COMMISSION OF INDIA


**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोक रोड, नवी दिल्ली ११० ००१


" मजबूत लोकशाहीसाठी व्यापक सहभाग "


वाय २५३०-१

## अनुक्रमणिका


| | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| | **खंड ए :** | | १-७ |
| | **मतमोजणी प्रतिनिधींची भूमिका, जबाबदाऱ्या व नियुक्ती** | | १ |
| १. | प्रस्तावना | | १ |
| २. | मतमोजणी प्रतिनिधींची भूमिका व जबाबदाऱ्या | | १ |
| ३. | मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती | | १-५ |
| | ३.१ | पात्रता | १ |
| | ३.२ | प्रति उमेदवार मतमोजणी प्रतिनिधींची संख्या | २ |
| | ३.३ | मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती | ४ |
| | ३.४ | मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी कालमर्यादा | ४ |
| | ३.५ | नियुक्ती रद्द करणे | ५ |
| ४. | मतमोजणी कक्षातील वर्तणूक | | ५ |
| ५. | मोजणी टेबलांच्या भोवती अडथळे उभारणे | | ६ |
| ६. | गुप्तता राखणे | | ७ |
| | **खंड बी :** | | ८-३५ |
| | **मतमोजणी प्रक्रिया** | | ८ |
| ७. | टपाली मतपत्रिकांची मोजणी | | ८-११ |
| ८. | निवडणुकीतील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी | | ११-१३ |
| | ८.१ | मतदान युनिट (बीयु) | ११ |
| | ८.२ | नियंत्रण युनिट (सीयु) | ११ |
| | ८.३ | (व्हीव्हीपीएटी) मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी | १२ |
| ९. | मतांची मोजणी (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये नोंदविलेल्या) | | १३-१६ |
| १०. | निकालाची सुनिश्चिती करणे | | १६ |
| ११. | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मते व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाण्यांच्या मोजणीशी संबंधित विशेष प्रकरणांमध्ये करावयाची कार्यवाही | | १७-२२ |
| १२. | नमुना १७ सी च्या मोजणीचा भाग दोन-निकाल पूर्ण करणे | | २२ |
| १३. | अंतिम निकालपत्र तयार करणे | | २२ |
| १४. | फेरमोजणी | | २३ |
| १५. | नव्याने मतदान झाल्यास मतमोजणीची स्थगिती | | २४ |
| १६. | मतमोजणीनंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी पुन्हा सीलबंद करणे | | २४-२५ |
| | वारंवार विचारले जाणारे प्रश्न | | २६-२८ |
| | | | |

## जोडपत्रे

| | | |
|---|---|---|
| जोडपत्रे एक | : | मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती व घोषणा (नमुना १८) |
| जोडपत्रे दोन | : | मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती रद्द करणे (नमुना १९) |
| जोडपत्रे तीन | : | नोंदविलेल्या मतांचा हिशेब व मतमोजणीचा निकाल |

## तक्त्यांची यादी

| | | |
|---|---|---|
| तक्ता एक | : | यादृच्छिकपणे निवडलेल्या पाच मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या कागदी चिठ्ठ्यांची पडताळणी |

## आकृत्यांची यादी

| | | |
|---|---|---|
| आकृती एक | : | मतमोजणी कक्षाचे आराखडे |
| आकृती दोन | : | मतमोजणी टेबलांसाठी अडथळ्यांची व्यवस्था |
| आकृती तीन | : | निवडणुकीतील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व (व्हीव्हीपीएटी) मतदार पडताळणी कागदी परिनिरीक्षण निशाणी |
| आकृती चार | : | नियंत्रण युनिटचे तपशीलवार छायाचित्र |
| आकृती पाच | : | चिठ्ठीसह मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी |
| आकृती सहा | : | वेगवेगळ्या प्रकारच्या मोहोरा व खूणचिठ्ठी |

## संक्षेपाक्षरे

| | |
|---|---|
| एसी | विधानसभा मतदारसंघ |
| एएस | विधानसभा प्रभाग |
| एआरओ | सहायक निवडणूक निर्णय अधिकारी |
| बीईएल | भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड |
| बीयु | मतदान युनिट |
| सीयु | नियंत्रण युनिट |
| सीइओ | मुख्य निवडणूक अधिकारी |
| इसीआय | भारत निवडणूक आयोग |
| इआरओ | मतदार नोंदणी अधिकारी |
| इटीपीबीएस | इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिका यंत्रणा |
| इव्हीएम्स | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे |
| एफएक्युस | वारंवार विचारले जाणारे प्रश्न |
| एफएलसी | प्रथमस्तरीय तपासणी |
| एनओटीए | वरीलपैकी काहीही नाही (नोटा) |
| एनआरआय | अनिवासी भारतीय |
| पीबीएस | टपाली मतपत्रिका |
| पीसी | लोकसभा मतदारसंघ |
| पीपीएस | गुलाबी कागदी मोहोर |
| पीएस | मतदान केंद्र |
| पीडब्ल्युडी | विकलांग व्यक्ती |
| आरओ | निवडणूक निर्णय अधिकारी |
| व्हीसीबी | मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी मतमोजणी कक्ष |
| व्हीव्हीपॅटस् | मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी |

## खंड ए

### मतमोजणी प्रतिनिधींची भूमिका, जबाबदाऱ्या व नियुक्ती

**१ प्रस्तावना :**

१.१ निवडणूक प्रक्रियेमध्ये मतमोजणी हा शेवटचा मोठा टप्पा आहे. मतदारांची खरी पसंती अचूक व योग्य मतमोजणीमधून व्यक्त झाल्याचे आढळून येते. म्हणून, मतमोजणी प्रक्रियेच्या महत्त्वावर खूपच भर देण्याची गरज आहे.

१.२ मतमोजणी प्रतिनिधी हा, उमेदवाराचा प्रतिनिधी म्हणून मतमोजणी कक्षामध्ये उपस्थित राहील आणि म्हणून मतमोजणी प्रक्रियेत पारदर्शकतेची सुनिश्चिती करण्यासाठी तो/ती महत्त्वाची भूमिका बजावील.

१.३ पुढील व्यक्तींना मतमोजणी कक्षाच्या आत प्रवेश दिला जाऊ शकतो.

(एक) मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक व सूक्ष्म निरीक्षक ;

(दोन) भारत निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती (भारत निवडणूक आयोगाद्वारे यथोचितरीत्या जारी केलेले प्राधिकार पत्र), व निरीक्षक ;

(तीन) निवडणुकीच्या संदर्भात कर्तव्यार्थ असलेले सरकारी सेवक ; व

(चार) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी.

१.४ यादृच्छिकीकरण प्रक्रियेचा वापर करून मतमोजणी पर्यवेक्षक मतमोजणी सहायक व सूक्ष्म निरीक्षक तैनात केले जातात. सूक्ष्म निरीक्षक त्याच्या/तिच्या संबंधित टेबलावरील मतमोजणी प्रक्रियेच्या शुद्धतेसाठी जबाबदार असतील.

**२. मतमोजणी प्रतिनिधींची भूमिका व जबाबदाऱ्या :**

२.१ कायद्यान्वये, मतमोजणी ही, मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली व निदेशनाअन्वये उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करावयाची आहे. कायदा, सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतमोजणी हाती घेण्याचा देखील प्राधिकार देतो. मतमोजणी एकाच वेळी एकापेक्षा जास्त ठिकाणी आणि एकाच ठिकाणी एकापेक्षा जास्त टेबलांवर केली जाऊ शकते. उमेदवार किंवा त्याच्या/तिच्या निवडणूक प्रतिनिधीने अशा प्रत्येक मोजणीच्या ठिकाणी आणि टेबलांवर प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची अपेक्षा केली जाऊ शकत नाही, कायदा उमेदवाराला मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्याची परवानगी देतो, जो मतमोजणीच्या ठिकाणी व मतमोजणी टेबलवर उपस्थित राहू शकतो, आणि त्याचे/तिचे हित पाहू शकतो. उमेदवारांचे प्रतिनिधी असल्याने, मतमोजणी प्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची असते व या महत्त्वाच्या कामात त्यांच्या सहकार्यामुळे मतमोजणी पर्यवेक्षक व मतमोजणी सहायकांना हे काम सोपे जाऊ शकेल.

२.२ मतमोजणी प्रतिनिधीने त्याला/तिला स्वतःला पुढील गोष्टी पूर्णपणे माहिती करून घ्यावी :—

२.२.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र–मतदार व्हीव्हीपॅटच्या साहाय्याने निवडणूक घेण्यासाठी विहित केलेले नियम व कार्यपद्धती संबंधीच्या नवीनतम अनुदेश.

२.२.२ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र– व्हीव्हीपॅटविषयक कार्ये व प्रचालन.

२.२.३ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅटमध्ये नोंदविलेल्या मतमोजणीची प्रक्रिया.

२.२.४ टपाली मतपत्रिका व इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिकांशी संबंधित प्रक्रिया.

**३. मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती :**

३.१ **पात्रता :**

३.१.१ मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तीसाठी कोणतीही अर्हता कायद्याने विहित केलेली नाही. तथापि, १८ वर्षे व त्यावरील वयाच्या व्यक्तींची मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्याचा सल्ला उमेदवारांना देण्यात आला आहे. त्यामुळे मतमोजणी दरम्यान त्यांचे हित योग्यरित्या पाहिले जाईल.

३.१.२ निवडणूक आयोगाच्या स्थायी अनुदेशानुसार सुरक्षा कर्मचारीवर्गाला मतमोजणी कक्षामध्ये प्रवेश दिला जात नाही. म्हणून, निवडणुकीदरम्यान पुढील व्यक्तींना उमेदवाराचा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करता येणार नाही :—

(क) केंद्र सरकार किंवा राज्य शासनाने विद्यमान मंत्री, संसद सदस्य किंवा राज्य विधानमंडळाचे सदस्य ;

(ख) महानगरपालिकेचा महापौर किंवा नगरपालिका/जिल्हा परिषदा/पंचायत संघ इत्यादींचा अध्यक्ष ;

(ग) केंद्राचे सार्वजनिक उपक्रम/राज्याचे सार्वजनिक उपक्रम, शासकीय मंडळे/महामंडळाचे अध्यक्ष व सदस्य ;

(घ) शासनाकडून कोणतेही मानधन घेणाऱ्या व्यक्ती किंवा कोणत्याही शासकीय/शासकीय अनुदानित संस्थांमध्ये अर्धवेळ काम करणाऱ्या व्यक्ती ;

(ङ) शासनात/शासकीय अनुदानित संस्थांमध्ये काम करणारे परावैद्यकीय/आरोग्य सेवा कर्मचारी, रास्त भाव दुकानाचे व्यापारी, अंगणवाडी कर्मचारी ;

(च) शासकीय सेवेतील व्यक्ती [ हा गुन्हा आहे व लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३४-क अन्वये अशा नियुक्त व्यक्तींना ३ (तीन) महिन्यापर्यंत वाढविता येईल अशा कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील ].

३.१.३ ग्रामपंचायतीचा प्रधान/ग्रामपंचायत सरपंच/पंचायत सदस्य, महानगरपालिका किंवा नगरपरिषदांचे परिषद सदस्य किंवा सदस्य व स्थानिक व्यक्ती, ज्या-ज्या मतदारसंघाच्या निवासी आहेत, त्यांना उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यास कोणताही प्रतिबंध असणार नाही. अनिवासी भारतीय जे भारताचे नागरिक आहेत अशांची मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यास कोणताही प्रतिबंध असणार नाही.

३.१.४ राज्याकडून (केंद्र व शासन दोन्ही) सुरक्षा कवच देण्यात आलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला, जरी त्याने त्याची सुरक्षा व्यवस्था परत केली किंवा सोडून देण्याचे ठरविले तरी, त्यास निवडणुकीदरम्यान कोणत्याही उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

३.१.५ तसेच, अशा व्यक्तीस आपल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांसह किंवा त्यांच्याशिवाय मतमोजणी कक्षामध्ये प्रवेश करता येणार नाही.

३.१.६ तथापि, जर अशी व्यक्ती निवडणूक लढवणारा उमेदवार असेल, ज्याला सशस्त्र सुरक्षा कर्मचारीवर्ग पुरविण्यात आलेले असतील, तो मतमोजणी कक्षात बसण्यासाठी आपले सशस्त्र सुरक्षा कर्मचारीवर्ग स्वेच्छेने परत करत आहे, असे त्याने हमीपत्र दिल्यास, अशा व्यक्तींना कक्षात बसण्याची परवानगी दिली जाईल.

## ३.२ प्रति उमेदवार मतमोजणी प्रतिनिधींची संख्या :

३.२.१ प्रत्येक उमेदवाराला जितकी मोजणीची टेबले आहेत तितक्या अनेक मतमोजणी प्रतिनिधींची व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या टेबलावर मतमोजणी पाहण्यासाठी आणखी एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्याची परवानगी देण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या अनुदेशांनुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासाठी एक टेबलाव्यतिरिक्त, एका मतमोजणी कक्षामध्ये चौदा टेबलांपेक्षा जास्त टेबल नसतील अशी टेबले मतमोजणीसाठी उपलब्ध करून देता येतील. अशाप्रकारे, उमेदवाराद्वारे नियुक्त करावयाच्या मतमोजणी प्रतिनिधींची जास्तीत जास्त संख्या साधारणपणे १५ पेक्षा जास्त नसावी, कारण मतमोजणी टेबलांची संख्या देखील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या टेबलासह साधारणपणे १५ पेक्षा जास्त नसतील. टपाली मतपत्रिका व इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी नियोजित अतिरिक्त टेबलांची संख्या लक्षात घेता, अशा प्रत्येक जादा टेबलासाठी अतिरिक्त मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती उमेदवारास करता येईल.

३.२.२ तथापि, भारत निवडणूक आयोगास सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांद्वारे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला १५ पेक्षा अधिक टेबले घेण्यासाठी परवानगी देता येईल. अशा प्रसंगी, १५ पेक्षा अधिक आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या मोजणी टेबलाच्या संख्येइतके मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी उमेदवाराला देखील परवानगी देता येईल.

३.२.३ कायद्यान्वये, निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक उमेदवाराला किंवा त्याच्या/तिच्या निवडणूक प्रतिनिधीला, मतदानासाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या किमान सात दिवस अगोदर, मतमोजणी कोणत्या ठिकाणी होईल व ज्या दिवशी मतमोजणीस प्रारंभ होईल त्या दिनांकाची व वेळेची लेखी माहिती देईल. तो/ती त्यांना मतमोजणी कक्षामध्ये किती मोजणी टेबले पुरविण्यात येतील. याबद्दल पुरेशी आगाऊ माहिती देईल, जेणेकरून, त्यांना त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करता येईल.

३.२.४ विधानसभा मतदारसंघासाठी, सामान्यतः मतमोजणी ही एकाच ठिकाणी केली जाते. तथापि, लोकसभा मतदारसंघासाठी, मतमोजणी वेगवेगळ्या ठिकाणी केली जाते. मतमोजणी प्रतिनिधींच्या जास्तीत जास्त संख्येच्या संदर्भात, वर नमूद केलेली मर्यादा, जेव्हा एकापेक्षा जास्त ठिकाणी मोजणी केली जाते, अशा प्रत्येक मोजणीच्या ठिकाणाच्या बाबतीत, स्वतंत्रपणे लागू होईल.

**विधानसभा मतदारसंघ/विधानसभा प्रभागासाठी**
**मतमोजणी कक्षाचा आराखडा (एकल निवडणूक)**




**मतमोजणी कक्ष**

३.२.५ लोकसभा व राज्य विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्यास, विधानसभा मतदारसंघ विभागनिहाय मतमोजणी एकाच वेळी केली जाईल. अशाप्रसंगी, संसदीय व विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवाराला त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी स्वतंत्रपणे नियुक्त करण्याची परवानगी असेल.

## मतमोजणी कक्षाचा आराखडा
## (एकाचवेळी दोन्ही निवडणुका)




**मतमोजणी कक्ष**

### ३.३ मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती :

३.३.१ मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती एकतर उमेदवाराने त्याने/तिने स्वतः किंवा त्याच्या/तिच्या निवडणूक प्रतिनिधीने करावी अशी नियुक्ती ही, निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ (जोडपत्र १) सोबत जोडलेल्या नमुना १८ मध्ये केली जाते. त्या नमुन्यामध्ये मतमोजणी प्रतिनिधीचे नाव, पत्ता भरण्यात यावे व उमेदवार किंवा त्याचा/तिचा निवडणूक प्रतिनिधी नमुन्यावर वैयक्तिकरीत्या स्वाक्षरी करील. मतमोजणी प्रतिनिधीदेखील त्याच्या/तिच्या नियुक्तीची स्वीकृतीचे प्रतीक म्हणून त्यावर स्वाक्षरी करील. अशा नमुन्यांच्या दोन प्रती प्रतिनिधीच्या छायाचित्रांसह, सर्व प्रकरणांत तयार केल्या जातील व त्यावर स्वाक्षरी केली जाईल. या नमुन्याची एक प्रत उमेदवार/निवडणूक प्रतिनिधीकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठवावयाचे आहे तर दुसरी प्रत मतमोजणी प्रतिनिधीला निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर ठेवण्यासाठी दिली जाते.

३.३.२ उमेदवारास त्याच्या/तिच्या सर्व मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती, नमुना १८ मध्ये एका पत्राद्वारे करता येईल. या प्रकरणात, सर्व मतमोजणी प्रतिनिधींनी नियुक्ती स्वीकारल्याचे चिन्ह म्हणून त्या नियुक्ती पत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

३.३.३ स्वाक्षरींबद्दल कोणतीही शंका नसल्यास नियुक्तीच्या स्वरूपात उमेदवाराची प्रतिरूप स्वाक्षरी देखील स्वीकारली जाते.

### ३.४ मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी कालमर्यादा :

३.४.१ भारत निवडणूक आयोगाने असे निदेश दिले आहेत की, सर्व मतदारसंघांत, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात न घेता, उमेदवारांना त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधींच्या याद्या अशा प्रतिनिधींच्या छायाचित्रांसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या तीन दिवस

अगोदर १७:०० तासांच्यापूर्वी सादर कराव्यात. निवडणूक निर्णय अधिकारी अशा प्रत्येक प्रतिनिधीसाठी ओळखपत्र तयार करील व उमेदवाराला ते देईल.

३.४.२ मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणीसाठी उपस्थित राहतील तेव्हा त्यांनी त्यांच्या नियुक्तीपत्रासह ओळखपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

३.४.३ मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या वेळेच्या किमान एक तास अगोदर मतमोजणी प्रतिनिधीच्या ओळखपत्रासह नियुक्तीचे पत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त वेळेनंतर प्राप्त झालेले कोणतेही नियुक्तीपत्र निवडणूक निर्णय अधिकारी स्वीकारणार नाही.

३.५ **नियुक्ती रद्द करणे :**

३.५.१ उमेदवाराला किंवा त्याच्या/तिच्या निवडणूक प्रतिनिधीला मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार असेल.

३.५.२ निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ (जोडपत्र दोन) सोबत जोडलेल्या नमुना १९ मध्ये अशी नियुक्ती रद्द केली जाते व ती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल केल्यानंतर त्या वेळेपासून ती कार्यान्वित होते. अशा प्रकरणामध्ये, उमेदवाराला मतमोजणी सुरू होण्यापूर्वी कोणत्याहीवेळी, ज्याची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे त्याच्य जागी दुसरा मतमोजणी प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार असेल. एकदा मतमोजणी सुरू झाल्यानंतर नवीन मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती करता येणार नाही.

३.५.३ अशा नवीन मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती वर स्पष्ट केलेल्या रीतीने करावयाची आहे.

## ४. मतमोजणी कक्षातील वर्तणूक :

४.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर त्याचे/तिचे नियुक्तीपत्र व ओळखपत्र दिल्यानंतर, मतमोजणी प्रतिनिधीने मतदानाची गुप्तता राखण्यासंबंधी त्याच्या/तिच्या नियुक्तीपत्रामध्ये असलेल्या प्रतिज्ञापत्रावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या समोर स्वाक्षरी करणे आवश्यक असेल. नियुक्तीपत्र, ओळखपत्र व प्रतिज्ञापत्राची पडताळणी केल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणी प्रतिनिधीस मतदान कक्षामध्ये प्रवेश करण्यास परवानगी देईल.

४.२ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कोणत्याही मतमोजणी प्रतिनिधीस मतमोजणी कक्षात प्रवेश करण्यापूर्वी त्याची/तिची वैयक्तिक झडती घेण्याचा पूर्ण अधिकार असेल.

४.३ प्रत्येक मोजणी प्रतिनिधीला निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून तो/ती कोणाचा प्रतिनिधी आहे हे दर्शविणारा बिल्ला दिला जाईल व तो/ती ज्या टेबलावर मोजणी पाहणार आहे. त्याचा अनुक्रमांक त्यावर दर्शवेल. त्याला/तिला देण्यात आलेल्या टेबलावरच त्याने/तिने बसून राहावयाचे आहे. संपूर्ण कक्षामध्ये फिरण्याची त्याला/तिला परवानगी असणार नाही. तथापि, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या टेबलावरील उमेदवार, त्याचा/तिचा निवडणूक प्रतिनिधी व त्यांच्या अनुपस्थितीत, केवळ त्याच्या/तिच्या मतमोजणी प्रतिनिधीला सर्व मतमोजणी टेबलांभोवती फिरण्याची परवानगी असेल.

४.४ मतमोजणी कक्षामध्ये कडक शिस्त व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येकाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला संपूर्ण सहकार्य करणे आवश्यक आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या सर्व निदेशांचे त्यांनी पालन करावे. त्यांनी हे लक्षात घ्यावे की, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास जी त्याच्या/तिच्या निदेशांचे उल्लंघन करत असेल तर अशा कोणत्याही व्यक्तीला मतमोजणी कक्षातून बाहेर पाठवता येईल.

४.५ मतमोजणी प्रक्रियेदरम्यान मतमोजणी प्रतिनिधी व इतरांना मतमोजणी दालनाच्या बाहेर जाऊ दिले जाणार नाही. दुसऱ्या शब्दात, जेव्हा मतमोजणी प्रतिनिधी व इतर मतमोजणी कक्षात असतील तेव्हा त्यांना सामान्यतः निकाल जाहीर झाल्यानंतरच बाहेर जाण्याची परवानगी देण्यात येईल.

४.६ मतमोजणी कक्षाजवळ पिण्याचे पाणी, अल्पोपहार, स्वच्छतागृह इत्यादी सर्व वाजवी सुविधा पुरविल्या जातील.

४.७ मतमोजणी प्रतिनिधींना मतमोजणी केंद्राच्या आत, श्राव्य किंवा दृकश्राव्य किंवा दृकश्राव्य ध्वनिमुद्रण करू शकतील असे भ्रमणध्वनी/आयपॅड/लॅपटॉप किंवा त्यासारखे इलेक्ट्रॉनिक उपकरण नेण्यास परवानगी असणार नाही. भारत निवडणूक आयोगाच्या निरीक्षकांना भ्रमणध्वनी नेण्यास परवानगी असेल परंतु ते त्यांचे भ्रमणध्वनी सायलंट मोडवर ठेवावा.

४.८ मतमोजणी प्रतिनिधीला मतदान कक्षाच्या आत मतमोजणी दरम्यान त्याच्या वापर/संदर्भासाठी पेन/पेन्सिल/कोरे कागद/टिप्पण वही मतदान संपल्यानंतर मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्राध्यक्षाने दिलेली १७सी (मतांची हिशोब) ची दुसरी प्रत नेण्याची परवानगी असेल.

४.९ मतमोजणीच्या ठिकाणी नियमानुसार “धुम्रपान करू नये” याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

४.१० मतमोजणी ओळीने मांडलेल्या टेबलांवर केली जावी. प्रत्येक ओळीतील टेबले अनुक्रमे अनुक्रमांकित केली जातील. प्रत्येक मतमोजणी टेबलवर, मतमोजणी प्रतिनिधीसाठी बसण्याची व्यवस्था खालील श्रेणींच्या अग्रक्रमाचा विचार करून केली जाईल, ते असे :

(एक) मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षांच्या उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी ;

(दोन) मान्यताप्राप्त राज्यस्तरावरील पक्षांच्या उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी ;

(तीन) इतर राज्यांच्या मान्यताप्राप्त राज्य पक्षांच्या उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी ज्यांना मतदारसंघात त्यांचे आरक्षित चिन्ह वापरण्याची परवानगी आहे ;

(चार) नोंदणीकृत अपरिचित राजकीय पक्षांच्या उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी ;

(पाच) अपक्ष उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी.

मतमोजणी प्रतिनिधी त्याच्या रांगेत ज्या क्रमाणे उमेदवारांची नावे मतदान पत्रिकेमध्ये दिसतील त्या क्रमाने बसतील.

## ५. मोजणी टेबलांच्या भोवती अडथळे उभारणे :

प्रत्येक मतमोजणी कक्षात, प्रत्येक मतमोजणी टेबलसाठी भोवताली अडथळे लावले जातील किंवा वायरची जाळी दिली जाईल जेणेकरून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतमोजणी प्रतिनिधीच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊ शकणार नाहीत. मतमोजणी प्रतिनिधी वायरची जाळी किंवा अडथळे ओलांडणार नाहीत व त्यांची बसण्याची व्यवस्था वायरची जाळी किंवा अडथळयाच्या पलीकडे असेल. तथा मतमोजणी प्रतिनिधीला, मतमोजणी टेबलावरील सर्व मोजणी प्रक्रिया दिसण्यासाठी सर्व वाजवी सुविधा पुरविण्यात येतील. निवडणूक निर्णय अधिकारी हे सुनिश्चित करतील की, अडथळे किंवा वायरची जाळी पारदर्शक आहे किंवा अडथळे उभारण्याच्या हेतूने वापरल्या जाणारे बांबू किंवा इतर सामग्रीच्या मध्ये किंवा वरच्या जागेत मोजणी प्रक्रिया पूर्ण पाहण्याची परवानगी देण्यासाठी पुरेशी जागा आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे अनधिकृत व्यक्तींकडून हाताळले जाणार नाहीत किंवा मोजणी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारे छेडछाड केली जाणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी त्याला/तिला योग्य वाटेल असा दृष्टिकोन स्वीकारावा.



**मतमोजणी टेबलांसाठी अडथळयांची व्यवस्था**

**६. गुप्तता राखणे :**

६.१ मतमोजणी कक्षाच्या आतील प्रत्येक व्यक्तीने कायद्यानुसार मतदानातील गुप्तता राखणे व ती राखण्यास मदत करणे आवश्यक आहे व अशी गुप्तता भंग पावेल अशी मानण्याजोगी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीला सांगता येणार नाही. या संदर्भात कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या किंवा दंडाच्या किंवा दोन्हींची शिक्षांस पात्र असेल. (लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ चे कलम १२८)

६.२ मतमोजणी सुरू होण्यापूर्वी, निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित सर्वांच्या माहितीसाठी व त्यांचे अनुपालन करण्यासाठी वर नमूद केलेल्या कलम १२८ च्या तरतुदी वाचून व स्पष्ट करून सांगेल.

# खंड बी :

## मतमोजणी प्रक्रिया

टाकलेल्या मताची दोन व्यापक श्रेणीमध्ये विभागणी केली जाऊ शकते, ते म्हणजे, टपाली मतपत्रिकेद्वारे टाकलेली मते व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे केलेले मतदान. टपाली मतपत्रिकेद्वारे टाकलेली मते दोन श्रेणीमध्ये विभागली जाऊ शकतात, ते म्हणजे, इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिका (इटीपीबीएस) व सर्वसाधारण टपाली मतपत्रिका (पीबीएस). हस्तपुस्तिकेचा हा विभाग सर्व तीन प्रकरणांमध्ये समाविष्ट असलेल्या प्रक्रियेचे वर्णन करतो. प्रकरण टपाली मतपत्रिकांचे दोन्ही प्रकार, म्हणजे, इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिका व टपाली मतपत्रिकांसाठी अनुसरावयाची मोजणी प्रक्रियेशी संबंधित आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र–व्हीव्हीपीएटी तपशील व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे टाकलेल्या मतासाठीची मतदान प्रक्रिया प्रकरण ८ नंतर दिली आहे.

### ७. टपाली मतपत्रिकांची मोजणी

७.१ पारेषणाच्या पद्धतीवर अवलंबून असलेल्या टपाली मतपत्रिका दोन श्रेणीमध्ये विभागल्या जातात, ते असे ; इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिका (इटीपीबीएस) व सर्वसाधारण टपाली मतपत्रिका (पीबीएस). इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिका ह्या केवळ " नोकरदार " मतदारांसाठी आहेत व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट मतदाराकडे अचिन्हांकित मतपत्रिकेचे हस्तांतरण इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या आहे, म्हणून असे म्हणतात. तथापि, मतदान केलेल्या मतपत्रिकेच्या परतीचा प्रवास प्रत्यक्ष टपाल यंत्रणेद्वारे होतो. दुसरीकडे, सर्वसाधारण टपाली मतपत्रिका (पीबी) मतदारांच्या विविध वर्गासाठी, ते म्हणजे ; निवडणूक कर्तव्यार्थ असलेले कर्मचारी, ८० वर्षे वयावरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, विकलांग व्यक्ती असे मतदार (मतदार यादीत चिन्हांकित) कोविड-१९ चे संशयास्पद/ग्रस्त असलेले मतदार इत्यादी व त्याच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून येणारे व परत असे पूर्णपणे प्रत्यक्ष अशी आहे.

७.२ टपाली मतपत्रिकेच्या या दोन्ही श्रेणींशी संबंधित मतमोजणी प्रक्रियेत कोणताही फरक नाही. तथापि, दोन्हीच्या मतमोजणीपूर्व पडताळणीची प्रक्रिया थोडी वेगळी आहे. ज्याअर्थी, सर्वसाधारण टपाल मतपत्रिकेच्याबाबतीत प्रत्येक संचातील ३ परिपत्र व घोषणापत्रे (नमुना १३ए, बी व सी) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून प्रत्यक्षपणे व उलटतपासणी करून केली जाते, तरीही इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिकांची पडताळणी/वैधता ही पाकिटे व घोषणापत्रांवरील क्युआर कोडचे स्कॅनिंग करून इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पाहिली जाते.

७.३ **इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिकांची पडताळणी/वैधता :**

७.३.१ केवळ मोजणी सुरू होण्यासाठी निश्चित केलेल्या तासापर्यंत प्राप्त झालेल्या इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिका मोजणीसाठी विचारात घेतल्या जातात.

७.३.२ इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या पारेषित टपाली मतपत्रिकेच्या बाबतीत, मतदाराला पाठवलेल्या प्रत्येक टपाली मतपत्रिकेची ओळख गुप्त ठेवलेली असते, मतमोजणीच्यावेळी परत आलेल्या टपाली मतपत्रिकांच्या खरेपणाची वैधता/पडताळणी करण्याची प्रक्रिया ही, पाकिटांवर (नमुना सी व नमुना बी) चिकटवलेल्या लेबलांवर आणि मतदारांच्या घोषणेवर (नमुना १३ए) क्युआर कोड वाचल्याने होते.

७.३.३ नमुना १३-सी उघडणे (बाहेरील पाकिट) :

वेळेत प्राप्त झालेल्या नमुना १३ सी मधील बाह्य आवरणांची पडताळणी करावी व ती एकामागोमाग एक उघडावीत. बाहेरील पाकिटावरील क्युआर कोड संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर) व क्युआर कोड रिडर वापरून स्कॅन केला जाईल व आवश्यक वैधता तपासणी केली जाईल. बाह्य पाकिटाची पडताळणी केल्यानंतर, संगणकाकडून एक युनिक अनुक्रमांक देण्यात येईल. या पाकिटाची पडताळणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी हाताने त्यावर अनुक्रमांक नमूद करील. अशा प्रकरणांसाठी, प्राप्त झालेल्या टपाली मतपत्रिकांच्या यादीतील काही बनावट नावांची शक्यता असल्यास संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर) क्युआर कोडमध्ये प्रवेश नोंदवून त्यांची शक्यता तपासेल. संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर) टपाली मतपत्रिकाच्या सर्व बनावट मतपत्रिकांची यादीची सूची देखील दाखवेल. निवडणूक

निर्णय अधिकारी संगणक आज्ञावलीने (सॉफ्टवेअर) ने दर्शविलेले सर्व बनावट पाकिटे शोधून काढेल व ते भौतिकरीत्या एकत्र ठेवेल व अशी सर्व बनावट/एकाहून अधिक मते अवैध ठरवेल. अवैध झालेली अशी सर्व पाकिटे पुढील प्रक्रियेसाठी उघडली जाणार नाहीत व ती बाजूला ठेवून देण्यात येतील व भविष्यातील संदर्भासाठी जतन करण्यात येतील. अशा बनावट टपाली मतपत्रिकांची संख्या नोंदवहीमध्ये चिन्हांकित करण्यात येईल.

वेष्टन "बी" (नमुना १३-सी) उघडल्यानंतर आत दोन कागदपत्रे असावयास हवीत. नमुना १३-ए मधील मतदाराने दिलेले घोषणापत्र हे पहिले कागदपत्र व दुसरे आतील वेष्टन म्हणजेच टपाली मतपत्रिका असलेली नमुना १३-बी. प्रत्येक वेष्टन उघडल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नमुना १३-ए मधील घोषणापत्र व नमुना १३-बी मधील वेष्टन बाहेर काढावे व घोषणापत्राचे स्कॅन व त्याची पडताळणी व छाननी करावी.

७.३.४ टपाली मतपत्रिका असलेले नमुना १३-बी मधील वेष्टन उघडण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने घोषणापत्र म्हणजेच नमुना १३-ए ची तपासणी करणे आवश्यक आहे व नमुना १३-बी उघडण्यापूर्वी व मोजणी करण्यापूर्वी, अशी सर्व घोषणापत्रे स्वतंत्रपणे ठेवून ती मोहोरबंद करणे आवश्यक असेल.

जर :

एक. वेष्टनामध्ये नमुना १३-ए मधील घोषणापत्र न मिळाल्यास

किंवा

दोन. नमुना १३-ए मधील घोषणापत्रामधील इलेक्ट्रॉनिक टपाली मतपत्रिका ओळखपत्र क्रमांक (ई-पीबीआयडी) जारी केलेल्या इलेक्ट्रॉनिक टपाली मतपत्रिकेशी जुळत नसेल किंवा

तीन. घोषणापत्रावर यथोचितपणे स्वाक्षरी केलेली नसेल किंवा ज्याला अधिकार आहे अशा सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित केले नसेल, किंवा घोषणापत्रामधील टपाली मतपत्रिकेचे इलेक्ट्रॉनिक टपाली मतपत्रिका ओळखपत्र क्रमांक नमुना १३-बी मधील वेष्टनावरील इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या टपाली मतपत्रिका ओळखपत्र क्रमांकापेक्षा भिन्न असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी नमुना १३-बी मधील आतील वेष्टन उघडण्याऐवजी टपाली मतपत्रिका नाकारेल.

७.३.५ अशा प्रत्येक नाकारलेल्या वेष्टनाला योग्यरीत्या पृष्ठांकित करावे व घोषणपत्र व वेष्टन परत नमुना १३-सी मध्ये ठेवावे (बाह्य पाकीट). नमुना १३ मधील सर्व वेष्टने स्वतंत्र पाकिटात एकत्रितपणे ठेवावीत. यथोचितरीत्या ती मोहोरबंद करावीत व सहज ओळखू येण्यासाठी त्यावर मतदारसंघाचे नाव, मतमोजणीचा दिनांक व आतील घटकांचे संक्षिप्त वर्णन त्यावर लिहून ठेवावे.

७.३.६ सर्व पाकिटांवरील क्युआर कोड वाचून पूर्ण झाल्यानंतर, मतमोजणीसाठी घेतलेल्या पाकिटांचा संच टपाली मतपत्रिकेसाठीच्या मतमोजणी टेबलांना दिला जाईल.

७.३.७ या टपाली मतपत्रिकांच्या मोजणीसाठी पुढील कार्यवाही निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ५४ ए तरतुदींनुसार व भारत निवडणूक आयोगाच्या या विषयावरील अनुदेशांनुसार असेल.

## ७.४ सर्वसामान्य टपाली मतपत्रिकांची पडताळणी :

७.४.१ नमुना १३-सी मधील 'वेष्टन-बी' उघडल्यानंतर, आतमध्ये दोन कागदपत्रे सापडणे आवश्यक आहे. पहिले नमुना १३-ए मधील मतदाराचे घोषणापत्र व दुसरे टपाली मतपत्रिका असलेले 'वेष्टन-ए' (नमुना १३-बी) टपाली मतपत्रिका असलेले 'वेष्टन-ए' (नमुना १३-बी) उघडण्यापूर्वी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने घोषणापत्र (नमुना १३-ए) तपासणे आवश्यक असेल.

७.४.२ पुढील कोणत्याही प्रकरणांच्या बाबतीत, आतील 'वेष्टन-ए' (नमुना १३-बी) न उघडलेली टपाली मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकारी नाकारील :

क. नमुना १३ सी मधील 'वेष्टन-बी' मध्ये नमुना १३ ए मधील घोषणापत्र व सापडल्यास ;

ख. जर घोषणापत्रावर मतदाराने स्वाक्षरी केली नसेल किंवा तसे करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याने योग्यरीत्या साक्षांकित केले नसेल किंवा अन्यथा ती पूर्णपणे सदोष असेल ;

ग. नमुना १३ ए मधील घोषणापत्रावर दिसणाऱ्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक नमुना १३ बी मधील आतील ' वेष्टन-ए' वर पृष्ठांकित केलेल्या अनुक्रमांकापेक्षा वेगळा असेल तर.

टीप.— जर साक्षांकित अधिकाऱ्याने त्या नमुन्यावर त्याचे/तिचे नाव व पद यासंबंधी सर्व संबंधित तपशील दिला असेल, परंतु साक्षांकित अधिकाऱ्याने त्याचा/तिचा शिक्का, नमुना १३ ए मधील मतदाराच्या घोषणापत्रावर मारलेला नसेल तरी केवळ या आधारावर ती टपाली मतपत्रिका नाकारली जाऊ शकत नाही. तसेच, जर प्रेषकाची ओळख नमुना १३ ए मधील त्याच्या/तिच्या घोषणापत्राच्याआधारावर पडताळणीयोग्य असेल तर, त्याने ज्यात टपाली मतपत्रिका परत पाठवली त्या बाह्य ' वेष्टन-बी ' (नमुना १३ सी) वर त्याची/तिची स्वाक्षरी नसेल तरीही, प्रेषका (मतदारा) ची टपाली मतपत्रिका त्या कारणास्तवदेखील नाकारली जाणार नाही.

७.४.३ नमुना १३ ए मधील घोषणापत्रातील दोषांमुळे टपाली मतपत्रिका नाकारण्याच्या सर्व प्रकरणांमध्ये, नाकारलेल्या श्रेणी मध्ये ते टाकण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्याची पुन्हा पडताळणी करावी.

७.४.४ त्यानंतर, नाकारलेल्यां व्यतिरिक्त नमुना १३ बी म्हणजेच उर्वरित ' वेष्टन-ए ' वर निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक अधिकारी पुढील कार्यवाही करील.

७.४.५ टपाली मतांच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी, छाननीमध्ये आढळलेली नमुना १३ ए मधील सर्व घोषणापत्रे प्रथम एका वेगळ्या पाकिटात ठेवाव्यात व ती सीलबंद कराव्यात.

## ७.५ टपाली मतपत्रिकांची मोजणी (दोन्ही प्रकार) :

७.५.१ निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ५४ ए च्या आवश्यकतेनुसार, टपाली मतपत्रिका प्रथम निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या टेबलवर मोजण्यासाठी घेतल्या जातील. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला प्राप्त झालेल्या सर्व टपाली मतपत्रिका त्याच्या/तिच्यासमोर आणाव्यात.

७.५.२ टपाली मतपत्रिकांच्या मोजणीचा टप्पा विचारात न घेता इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रावरील मोजणी चालू राहील. एकदा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मोजणी पूर्ण झाली की, व्हीव्हीपीएटीच्या मोजणीसाठी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांची मोजणी सुरू होईल.

७.५.३ कृपया हे लक्षात ठेवावे की, नमुना १३ सी मधील ' वेष्टन-बी ' ज्यात टपाली मतपत्रिका आहेत, मतमोजणीची सुरुवात करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर प्राप्त झाल्यास त्या उघडण्यात येणार नाहीत व त्याची मोजणी केली जाणार नाही [नियम ५४ ए(२)], व मतमोजणी सुरू झाल्यानंतर अशा प्राप्त झालेल्या प्रत्येक वेष्टनावर नमुना १३ सी मधील वेष्टनावर उचित पृष्ठांकन देऊन त्या संदर्भात योग्य ते समर्थन केले जाईल.

७.५.४ त्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नमुना १३बी मधील ' वेष्टन-ए ' एकापाठोपाठ एक उघडून त्यातील टपाली मतपत्रिका काढून घेईल. निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अशा प्रत्येक मतपत्रिकेची छाननी करील व त्याची वैधता निश्चित करील.

७.५.५ टपाली मतपत्रिका पुढील कारणांवरून नाकारली जाईल :—

(क) त्यावर कोणतेही मत नोंदवलेले नसेल तर, किंवा

(ख) त्यावर एकापेक्षा जास्त उमेदवारांच्या बाजूने मते दिली गेली असतील तर ; किंवा

(ग) ती बनावट मतपत्रिका असेल तर ; किंवा

(घघ) त्याचे इतके नुकसान झाले असेल किंवा त्याची विटंबना केली गेली असेल की, त्याची खरी मतपत्रिका म्हणून ओळख पटवता येत नाही ; किंवा

(ङ) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मतदाराला पाठवलेल्या ' वेष्टन-बी ' मध्ये ते परत केले गेले नसेल तर ; किंवा

(च) मत दर्शविणारी खूण अशाप्रकारे केली गेली असेल की, ज्या उमेदवाराला मत देण्यात आले आहे तो उमेदवार शोधणे संशयास्पद असेल ; किंवा

(छ) त्यावर मतदार ओळखता येईल अशी कोणतीही खूण किंवा लिखाण असेल तर.

**टीप.—** मतदाराने टपाली मतपत्रिकेवर आपले मत दर्शविण्यासाठी कायद्याने कोणतेही विशिष्ट चिन्ह त्यावर असणे आवश्यक नाही. जोपर्यंत एखाद्या विशिष्ट उमेदवाराला मतदान करण्याचा मतदाराच्या हेतू कोणत्याही वाजवी संशयाच्या पलीकडे स्पष्ट आहे, तोपर्यंत टपाली मतपत्रिकेवर केलेले कोणतेही चिन्ह वैध म्हणून स्वीकारले जाऊ शकते.

७.६ ज्या प्रकरणांमध्ये विजयाचे अंतर मोजण्याच्या वेळी अवैध म्हणून नाकारलेल्या टपाली मतपत्रिकांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, टपाली मतपत्रिका नाकारण्याचा निर्णय योग्य होता याची त्याला/तिला खात्री करून घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी स्वतः काळजीपूर्वकपणे नाकारलेल्या सर्व टपाली मतपत्रिका अवैध होत्या याची पडताळणी करील. निरीक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी पुन्हा पडताळणीचे निष्कर्ष अभिलिखित करेल व निकाल अंतिम करण्यापूर्वी स्वतःचे समाधान करेल.

## ८. निवडणुकीतील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व (व्हीव्हीपीएटी) मतदार पडताळणी कागदी परिनिरीक्षण निशाणी :




**नियंत्रण युनिट व्हीव्हीपीएटी मतदान युनिट**

भारतातील निवडणुका ह्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाण्यांसह व्हीव्हीपीएटीसह आयोजित केले जातात. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदाराने टाकलेल्या प्रत्येक मताची अचूक नोंद करते व उमेदवारानुसार टाकलेल्या प्रत्येक मताचा अचूक व अद्यावत हिशोब ठेवते. मतदार यंत्राद्वारे दिलेली सर्व मते ही वैध मते आहेत व त्यामुळे कोणतेही मत नाकारलेले किंवा अवैध नाही. याप्रकारे मतमोजणीची प्रक्रिया साधी, सोपी व जलद बनली आहे.

### ८.१ मतदान युनिट (बीयु) :

एक मतदान युनिट जास्तीत जास्त १६ उमेदवारांची गरज पूर्ण करते व २४ मतदान युनिटे ३८४ उमेदवारांच्या (वरीलपैकी कोणीही नाही) यासह गरजेसाठी एकत्रितपणे जोडली जाऊ शकतात. नियंत्रण युनिटामधील मतदान झालेल्या मतांच्या मोजणी दरम्यान, मतदान युनिटाची (युनिटांची) आवश्यकता नसेल.

८.२ **नियंत्रण युनिट (सीयु) :** नियंत्रण युनिट मतदान नोंदवते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील मतांच्या मोजणी दरम्यान, केवळ नियंत्रण युनिट (युनिटे) च आवश्यक असेल. नियंत्रण युनिटाच्या वरील मोठ्या भागात, उमेदवारांची संख्या, एकूण मतदानाची आकडेवारी, प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते इत्यादीसारखी माहिती प्रदर्शित करण्याची तरतूद आहे, या भागाला नियंत्रण युनिटाचा दर्शनी भाग असे म्हटले जाते. या दर्शनी भागाच्या खाली, दोन स्वतंत्र कप्पे असतात ;

डाव्या बाजूच्या कप्प्यामध्ये पॉवर पॅक (बॅटरी) ठेवण्यासाठी " बॅटरी कप्पा " (कंपार्टमेंट) आहे [ते ७.५ व्होल्ट असलेल्या पॉवर पॅक (बॅटरी) वर चालते] व उजव्या बाजूला दुसरा कप्पा " उमेदवार संचाचा कप्पा " ज्यात " वरीलपैकी कोणीही नाही " यासह विशिष्ट निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या दिली आहे. बॅटरी व उमेदवार संच कप्प्यांखाली " निकाल विभाग कप्पा " दिला आहे. या कप्प्यात :—

(एक) डाव्या बाजूला ' क्लोज ' बटन, मतदान बंद करण्यासाठी वापरले जाते,

(दोन) मधली दोन बटने—रिझल्ट व प्रिंट निकाल निश्चित करण्यासाठी निकालाचे बटन. तपशीलवार निकालाची प्रिंट प्रत काढण्यासाठी मुद्रण बटन (या प्रयोजनासाठी नियंत्रण युनिटाला जोडावयाचे विशेष गॅझेट) व

(तीन) जेव्हा त्यातील माहितीची आवश्यकता नसेल तेव्हा यंत्रातील नोंदविलेली माहिती काढून टाकण्यासाठी, उजव्या बाजूचे बटन आहे ' क्लीअर '. नियंत्रण युनिटाच्या खालील भागात, दोन बटने आहेत एक " मतदान " व दुसरे ' टोटल ' असे चिन्हांकित असेल. ' मतदान ' बटन दाबल्यानंतर मतदान युनिट मत नोंदविण्यासाठी तयार होते व ' टोटल ' बटन दाबल्यानंतर त्या टप्प्यापर्यंत झालेल्या मतदानाचे नोंदविलेल्या मतांची एकूण संख्या (परंतु उमेदवारनिहाय खंडित न करता) निश्चित केली जाऊ शकते. या विभागाला नियंत्रण युनिटाचा ' मतदान विभाग ' म्हणून ओळखला जातो.




**नियंत्रण युनिटचे तपशीलवार छायाचित्र**

८.३ **(व्हीव्हीपीएटी) मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी :**

व्हीव्हीपीएटी (मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी) ही एक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांशी जोडलेली स्वतंत्र यंत्रणा आहे जी मतदारांना त्यांची मते इच्छेनुसार टाकली आहेत याची पडताळणी करून देते. मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी हे यंत्र २२.५ व्होल्टच्या पॉवर पॅक (बॅटरी) वर चालते. जेव्हा मत टाकले जाते, तेव्हा उमेदवारांचा अनुक्रमांक, नाव व चिन्ह असलेली चिठ्ठी मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीवर छापली जाते व ७ सेकंदासाठी ती पारदर्शक पट्टीतून दिसते. त्यानंतर, ती छापील चिठ्ठी आपोआप कापली जाऊन मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या मोहोरबंद असलेल्या ड्रॉप बॉक्समध्ये पडते व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये मत यशस्वीपणे नोंदविल्या गेल्याची सुनिश्चिती करणारा बीप असा आवाज नियंत्रण युनिटातून येतो.




**चिठ्ठीसह मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी**

**९. मतांची मोजणी (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये नोंदविलेल्या) :**

टपाली मतांची मोजणी सुरू झाल्यानंतर, ३० मिनिटांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील मोजणी सुरू होऊ शकते व टपाली मतमोजणी टप्पा विचारात न घेता चालू राहील. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर मोजणी पूर्ण झाल्यावर, मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी चिठ्ठ्यांची देखील मोजणी सुरू होऊ शकेल.

९.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून टपाली मतपत्रिकांची मोजणी त्याच्या/तिच्या टेबलावर केली जात असताना, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या सहाय्याने मतदान केंद्रावर नोंदवलेल्या मतांची मोजणी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी/अधिकाऱ्यांकडून देखील मतमोजणी कक्षामध्ये दिलेल्या इतर टेबलांवर घेतील. या प्रयोजनांसाठी, मतदान केंद्रांवरून प्राप्त झालेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचे नियंत्रण युनिट विविध मतमोजणी टेबलांवर वितरीत केले जातील, मतदान केंद्र क्रमांक १ च्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटापासून सुरूवात करून, टेबल क्र. १ वर ते वितरित केले जाईल, मतदान केंद्र क्रमांक २ चे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट, टेबल क्र. २ ला आणि अशा रीतीने सर्व वितरित केले जातील. प्रत्येक मतमोजणी टेबलावर, एकावेळी एका मतदान केंद्रावर दिलेली मते घेतली जातील. याप्रकारे, मतमोजणीच्या पहिल्या फेरीत एकाचवेळी जितकी मतदान केंद्रांची संख्या आहे तितक्या मतमोजणी टेबलांची संख्या असेल तितक्याच मतांची मोजणी केली जाईल. मतमोजणी टेबल व मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन आवश्यक तितक्या फेऱ्यांमध्ये मतमोजणी केली जाईल व ती पूर्ण केली जाईल. मागील फेरीची मतमोजणी संपल्याशिवाय, पुढील फेरीसाठी नियंत्रण युनिटे मतमोजणी टेबलांवर आणली जाणार नाहीत. एकाच वेळी निवडणुकांच्या बाबतीत, मतमोजणी टेबलांची एकूण संख्या समान संख्येच्या टेबलांच्या दोन गटात विभागली पाहिजे. पहिला गट विधानसभा निवडणुकीचा व दुसरा गट लोकसभा निवडणुकीचा असावा. उदाहरणार्थ, जर मतमोजणी टेबलांची एकूण संख्या १४ (चौदा) असेल, तर मतमोजणीच्या पहिल्या फेरीत, विधानसभा निवडणुकीसाठी मतदान केंद्र क्र. १ वर वापरलेले नियंत्रण युनिट टेबल क्र. १ वर देण्यात यावे आणि मतदान केंद्र क्र. १ वर लोकसभा निवडणुकीसाठी वापरलेले नियंत्रण युनिट टेबल क्र. ८ ला द्यावे, म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी पहिले टेबल, व मतदाराने केंद्र क्र. २ वर वापरलेले विधानसभा निवडणुकीसाठीचे नियंत्रण युनिट टेबल क्र. २ ला देण्यात यावे व मतदान केंद्र क्रमांक २ वरील लोकसभा निवडणुकीसाठी वापरले जाणारे नियंत्रण युनिट टेबल क्र. ९ वर देण्यात यावे, म्हणजेच लोकसभा निवडणुकीसाठीची मतमोजणीसाठी दुसरा टेबल आणि असेच पुढे चालू राहील. मतमोजणी प्रतिनिधीने त्याच्या/तिच्या माहितीसाठी अशा वितरणाचा लेखा त्याच्याकडे/तिच्याकडे ठेवावा. हे नोंद घेण्यासारखे आहे की, एकाच वेळीच्या निवडणुकांच्या मतमोजणीच्या बाबतीत, विधानसभा व लोकसभा अशा दोन्ही निवडणुकांच्या संदर्भात, मागील फेरीतील

मतमोजणी पूर्ण झाल्यानंतरच मतमोजणीची पुढील फेरी घेतली जाईल व फेरी पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्रावर वापरलेली नियंत्रण युनिटे मतमोजणी टेबलावरून काढून टाकण्यात येतील.

९.२ मतमोजणीच्या वेळी, त्या मतदान केंद्रावरील मतदानाचा निकाल तपासण्यासाठी विशिष्ट मतदान केंद्रावर वापरल्या गेलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे केवळ नियंत्रण युनिट आवश्यक असेल. मतदान युनिटे सुरक्षित कक्षामध्ये ठेवावी लागतील.

९.३ नियंत्रण युनिटासोबत, त्या मतदान केंद्राच्या संबंधीचा नमुना १७ सी मध्ये नोंदवलेल्या मतांचा प्रस्तुत लेखा देखील मतमोजणी टेबलावर पाठविला जाईल.

९.४ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या कोणत्याही नियंत्रण युनिटामध्ये नोंदवलेल्या मतांच्या मोजणीपूर्वी, नियंत्रण युनिटांवरील मोहोरबंद तपासले जातात. मतमोजणी टेबलावर उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधींना विशेष खूणचिठ्ठी तपासण्याची हिरवी कागदी मोहोर तपासण्याची परवानगी दिली जाईल व तो असेच इतर महत्त्वाचे मोहोर, वहन पेटी व नियंत्रण युनिटावर जोडले गेले असतील व मोहोर शाबूत आहेत व नियंत्रण युनिटाच्या मोहोरची छेडछाड केली गेलेली नाही याविषयी स्वतःची खात्री पटवून घेईल. जर एखाद्या नियंत्रण युनिटाच्या मोहोरशी छेडछाड केलेली असेल तर, त्या यंत्रात नोंदविलेली मते मोजणीमध्ये धरता येणार नाहीत व हे प्रकरण भारत निवडणूक आयोगाकडे पुढील निदेशांसाठी नोंदवले जाईल.

९.५ नियंत्रण युनिटाची प्रत्येक वहनपेटी मतमोजणी टेबलावर आणली जात असल्याने, मतदान केंद्रावरील मतदान केंद्रातील अधिकाऱ्याने तेथे चिकटवलेल्या मोहोरची तपासणी करावी. जरी एखाद्या वहनपेटीची मोहोर कोणत्याही परिस्थितीत जशीच्यातशी नसेल तरीही, त्यात ठेवलेले नियंत्रण युनिट त्यावरील मोहोर आणि विशेषतः त्या युनिटवरील कागदी मोहोर (मोहोरा) शाबूत असेल (असतील) तर त्याच्याशी छेडछाड केली गेली असे होऊ शकत नाही. त्यानंतर वहनपेटी उघडली जाईल व नियंत्रण युनिट बाहेर काढले जाईल.

९.६ प्रत्येक नियंत्रण युनिट वहनपेटीतून जसे बाहेर काढले जाईल, तसे त्याचा अनुक्रमांक तपासला जाईल, त्यामुळे मतदान केंद्रावर वापरण्यासाठी पुरवलेले तेच नियंत्रण युनिट आहे याची सुनिश्चिती होईल. त्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मतदान केंद्रावर यंत्र पाठविण्यापूर्वी लावलेली 'उमेदवार संच विभाग' यावरील मोहोर व मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षाने निकाल विभागाच्या बाह्य वेस्टनावर लावलेली मोहोर तपासून घेतली जाईल. जर निकाल विभागाच्या आतील वेस्टनावर लावलेली कागदी मोहोर शाबूत असेल तर, नियंत्रण युनिटावरील मोहोरपैकी कोणतीही मोहोर शाबूत नसेल तरीही नियंत्रण युनिटामध्ये छेडछाड केली जाऊ शकत नाही.

९.७ निकाल (रिझल्ट) विभागाचे बाहेरील वेस्टन उघडल्यावर, मतदान केंद्राध्यक्षाने मोहोरबंद केलेले आतील वेस्टन दिसेल. ही मोहोर शाबूत नसेल परंतु, कागदी मोहोर शाबूत असेल तर नियंत्रण युनिट चुकीच्या रीतीने हाताळले जाऊ शकत नाही. निकाल (रिझल्ट) विभागाच्या आतील वेस्टनात, हिरवी कागदी मोहोर असेल. हिरवी कागदी मोहोर एवढी घट्ट बसविली जोईल की मोहरबंद पट्टीची दोन्ही टोके ज्या आतील कप्प्यात निकाल (रिझल्ट) बटने आहेत त्या बाजूंपासून बाहेरील बाजूस राहतील. कागदी मोहोरच्या अशाच एका उघड्या टोकावर त्या मोहोरचा छापलेला अनुक्रमांक असेल. या कागदी मोहोरवर हा नमुना १७-सी च्या भाग एक च्या १० या रकान्यात मतदान केंद्राध्यक्षाने तयार केलेल्या कागदी मोहोरच्या लेख्यात दिलेल्या अनुक्रमांकाशी ताडून पाहतील. मतमोजणी टेबलावरील उपस्थित असणारे मतमोजणी प्रतिनिधी मतदानास सुरुवात होण्यापूर्वी मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षाने बसविलेली तीच कागदी मोहोर आहे याची स्वतः अनुक्रमांक पाहून खात्री करून घेऊन ताडून पाहू शकेल.



गुलाबी कागदी मोहोर (दोन भाग)




हिरवी कागदी मोहोर



साधी पत्ता चिठ्ठी




विशेष खूण चिठ्ठी

## वेगवेगळ्या प्रकारच्या मोहोर व खूणचिठ्ठी

९.८ जर नियंत्रण युनिटामध्ये प्रत्यक्षात वापरलेल्या कागदी मोहोरचा अनुक्रमांक कागदी मोहोरच्या हिशेबात मतदान केंद्राध्यक्षाने दर्शविलेल्या अनुक्रमांकाशी जुळत नसेल तर, कागदी मोहोर हिशेबात चूक आहे असे होऊ शकते किंवा प्रथमदर्शनी मतदान यंत्रात काहीतरी गैरव्यवहार झाल्याचा संशय निर्माण होऊ शकेल. मतदान केंद्राध्यक्षाने परत केलेल्या न वापरलेल्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक तपासून निवडणूक निर्णय अधिकारी यावर निर्णय घेतील. हे कारकुनी चुकीचे प्रकरण असल्याचे त्याला/तिला आढळून आल्यास तो/ती या विसंगतीकडे दुर्लक्ष करेल.

९.९ दुसरीकडे, मतदान यंत्राची हाताळणी चुकीच्या पद्धतीने झाली असल्याची किंवा त्या मतदान केंद्रावर वापराकरिता पाठवलेले मतदान यंत्र व हे एकत्र नसल्याची निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, ते यंत्र बाजूला ठेवण्यात येईल व त्यात नोंदलेल्या मतांची मोजणी करण्यात येणार नाहीत. या विषयीचे निदेश देण्यासाठी तो/ती या प्रकरणाचा अहवाल भारत निवडणूक आयोगाकडे पाठवील. कोणत्याही मतदान यंत्रात गैरप्रकार झाल्याचे आढळून आल्यास, कायद्यानुसार, संपूर्ण मतमोजणी स्थगित करण्याची आवश्यक नसेल. निवडणूक निर्णय अधिकारी इतर मतदान केंद्रांच्या बाबतीतील मतमोजणी पुढे चालू ठेवील.

९.१० प्रत्येक फेरीच्या शेवटी, निरीक्षक यादृच्छिकपणे संबंधित फेरीतील ज्यांची मोजणी करण्यात आली आहे त्या नियंत्रण युनिटांपैकी कोणतेही दोन नियंत्रण युनिटे निवडेल. त्यानंतर तो/ती निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने विशेषकरून या प्रयोजनासाठी तैनात केलेल्या अतिरिक्त मतमोजणी कर्मचाऱ्याला यादृच्छिकपणे निवडलेल्या नियंत्रण युनिटांमधून, यंत्राद्वारे दर्शविल्या प्रमाणे मतदान केलेल्या मतांचा तपशील स्वतंत्रपणे नोंदविण्याचा निदेश देईल. त्यानंतर तो/ती या दोन्हींमध्ये काही विसंगती आहे का हे तपासण्यासाठी अधिकाऱ्यांनी दिलेल्या टेबलनिहाय निकालाशी तुलना करून पाहील. मात्र यादृच्छिक तपासणीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना टेबलनिहाय निकाल दिलेल्या तपशिलांची माहिती होणार नाही याची काळजी घ्यावी.

९.११ प्रत्येक मतमोजणी टेबलसाठी एक मतमोजणी पर्यवेक्षक व एक सूक्ष्म निरीक्षक असेल व याशिवाय प्रत्येकी १४ मतमोजणी टेबलांवर एक सूक्ष्म निरीक्षक बसेल. सूक्ष्म निरीक्षक हा नेहमीच केंद्र सरकार/केंद्र सरकारच्या सार्वजनिक उपक्रमाचा कर्मचारी असेल. हे सूक्ष्म निरीक्षक त्या टेबलवरील प्रत्येक फेरीत मोजल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे प्रदर्शित झालेल्या मतांचे तपशील लिहून ठेवील. या सूक्ष्म निरीक्षकांना मुद्रणपूर्व तक्ता देण्यात येईल ज्यावर नियंत्रण युनिट क्रमांक, फेरीचा क्रमांक, टेबल क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक लिहिण्यासाठी मोकळी जागा व त्यानंतर मतदान कागदावर ते जसे असतील त्याप्रमाणे निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांची नावे व वरीलपैकी कोणीही नाही यासाठी पॅनल असेल. ते त्या तक्त्याच्या शेवटी स्वाक्षरी करतील व प्रत्येक फेरीनंतर निरीक्षकाकडे ते सुपूर्द करतील.

९.१२ पुरेशा प्रमाणात केंद्र सरकारी कर्मचारी उपलब्ध नसतील तर, विभागीय आयुक्त/मुख्य निवडणूक अधिकारी शेजारील जिल्ह्यातील विभागामधून कर्मचाऱ्यांची आवश्यक संख्या वळती करून, ही तूट भरून काढील. मतमोजणी केंद्रावर वरीलप्रणाणे अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यापूर्वी त्यांना थोडक्यात दिशानिदेशन प्रशिक्षण दिले जाईल. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून या अतिरिक्त कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देखील देण्यात येईल. अशा अतिरिक्त कर्मचाऱ्यांची मतदारसंघनिहाय व त्यापाठोपाठ टेबलनिहाय तैनात देखील निरीक्षकाद्वारे यादृच्छिकपणे करण्यात येईल.

९.१३ भारत निवडणूक आयोगाद्वारे नामनिर्देशित केलेल्या व निवडणूक प्रक्रियेदरम्यान संबंधित मतदारसंघामध्ये तैनात केलेल्या निरीक्षकांना, कायद्यान्वये दिलेल्या वैधानिक तरतुदीनुसार मतमोजणी प्रक्रियेवर देखरेख व पर्यवेक्षण करण्याची विशेष जबाबदारी देण्यात आलेली आहे. निकाल जाहीर होण्यापूर्वी कोणत्याही वेळी मतमोजणी प्रक्रिया थांबविण्याचा अधिकार त्यांना प्रदान करण्यात आलेला आहे किंवा कायद्यात तरतूद केल्यानुसार, त्यांना वेगवेगळ्या परिस्थितीत, निकाल जाहीर न करण्याचे निदेश निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देता येतील.

९.१४ ज्या प्रकरणांमध्ये मतमोजणीची प्रक्रिया थांबवण्याचे आदेश निरीक्षकांनी दिलेले असतील, अशा प्रकरातील तपशीलवार अहवाल निरीक्षक व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी एकत्रितपणे किंवा स्वतंत्रपणे भारत निवडणूक ओागाकडे यथोचित आदेश मागवण्यासाठी सादर करावेत.

## १०. निकालाची सुनिश्चिती करणे :

१०.१ कागदी मोहोर शाबूत आहे. मतदान केंद्रावर जे नियंत्रण युनिट पुरवले होते तेच नियंत्रण युनिट व त्यात कोणतीही छेडछाड झालेली नाही याची खात्री पटल्यानंतर त्यामध्ये नोंदवलेल्या मतांची मोजणी करण्यात येईल. या प्रयोजनासाठी मतमोजणी पर्यवेक्षकाकडून खालील कार्यपद्धती अनुसरण्यात येईल.

(१) नियंत्रण युनिटच्या मागील कप्प्यामध्ये दिलेला पॉवर स्वीच "ऑन" स्थितीत ठेवला जावा. नियंत्रण युनिट दर्शनी विभागातील "ऑन" दिवा नंतर हिरवा चमकेल.

(२) निकाल विभागाच्या आतील वेष्टनाच्या वरच्या छिद्राखाली देण्यात आलेल्या रिझल्ट (निकालाच्या) बटनावर हिरव्या कागदी मोहोर मधून छिद्र केले जाईल.

(३) नंतर रिझल्ट (निकालाचे) बटन दाबले जाईल.

(४) "रिझल्ट (निकाला)" चे बटन असे दाबल्यावर, मतदान केंद्रावरील प्रत्येक उमेदवाराकरिता नोंदवलेल्या मतांची संख्या व यापैकी कोणीही नाही ची (नोटा) संख्या नियंत्रण युनिटच्या दर्शनी पॅनलमध्ये आपोआप प्रदर्शित होईल.

(५) नमुना १७ सी च्या मतमोजणीच्या भाग-दोन निकालामध्ये मतमोजणी पर्यवेक्षकाकडून अनुक्रमिक उमेदवारानिहाय प्रदर्शित केलेल्या निकालाची नोंद करण्यात येईल.

१०.२ आवश्यकता भासल्यास, उमेदवार आणि/किंवा त्यांचे प्रतिनिधींना त्यावरील निकाल नोंदवून घेण्यास साहाय्य करण्यासाठी रिझल्ट (निकाल) चे बटन पुन्हा दाबता येईल.

१०.३ निकाल नोंदवून घेतल्यानंतर, रिझल्ट (निकाल) विभागाचे वेष्टन बंद करण्यात येईल व नियंत्रण युनिटचा स्वीच बंद करण्यात येईल.

**११. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मते व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाण्यांच्या मोजणीशी संबंधीत विशेष प्रकरणांमध्ये करावयाची कार्यवाही :**

११.१ मतदान सुरू होण्याचा व समाप्तीचा दिनांक व वेळ यामध्ये विसंगती आढळल्यास करावयाची प्रक्रिया.

११.१.१ अभिरूप मतदानाच्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेला दिनांक व वेळेतील फरकाची तुलना केली जाते.

११.१.२ मतमोजणीच्या वेळी मतदानाच्या सुरुवातीचा व समाप्तीचा दिनांक व वेळेच्या फरकाशी फरक जुळत नसेल तर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी बाजूला ठेवले जातात व ते प्रकरण भारत निवडणूक आयोगाकडे विचारार्थ पाठवले जाते.

११.१.३ मतमोजणीच्या वेळी लक्षात आलेले मतदान सुरू होण्याच्या व समाप्तीच्या दिनांकाच्या व वेळेच्या फरकाशी जुळत असेल तर, ती विसंगती उमेदवार व त्याच्या प्रतिनिधींना समजावून सांगितली जाते.

११.१.४ त्यानंतर, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये असलेल्या मतांची मोजणी नेहमीच्या पद्धतीने करण्यात येईल.

११.२ मतदानाच्या शेवटी “क्लोज (बंद)” बटन न दाबल्यास करावयाची प्रक्रिया.

११.२.१ नमुना १७-सी मध्ये नमूद केलेल्या एकूण मतदान केलेल्या मतांसह नियंत्रण युनिटमधील एकूण मतदानाशी जुळवून पाहण्यासाठी मतमोजणी पर्यवेक्षकाद्वारे नियंत्रण युनिटचे टोटल (एकूण) बटन दाबण्यात येईल.

११.२.२ जर ते जुळत असेल तर, मतमोजणी पर्यवेक्षक नियंत्रण युनिटचे क्लोज (बंद) बटण दाबेल व त्यानंतर निकालाची माहिती मिळविण्यासाठी रिझल्ट (निकाल) बटण दाबेल.

११.२.३ जर ते जुळत नसेल तर, नियंत्रण युनिट त्याच्या वहन पेटीत ठेवून त्याला मोहोरबंद केले जाईल व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या ताब्यात देण्यासाठी ते बाजूला ठेवण्यात येईल. तसेच इतर यंत्रांमधील मतमोजणी आहे तशीच पुढे चालू राहील. संबंधित मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपॅट) भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मोजण्यात येतील.

**११.३ मतमोजणीच्या वेळी नियंत्रण युनिट रिझल्ट (निकाल) दाखवत नसेल अशा प्रकरणी करावयाची प्रक्रिया.**

निकाल प्राप्त करण्यासाठी नियंत्रण युनिटमध्ये नवीन पॉवर पॅक (बॅटरी) बसविण्यात आली असेल. तरी देखील नियंत्रण युनिट रिझल्ट (निकाल) दाखवत नसेल तर, नियंत्रण युनिट त्याच्या वहन पेटीत ठेवण्यात यावे व त्यानंतर मतमोजणी कक्षातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या ताब्यात देण्यात यावे. इतर यंत्रांमधील मतमोजणी नेहमीप्रमाणे सुरू ठेवावी. संबंधित मतदार पडताळणी कागदी परिनिरीक्षण निशाणीची (व्हीव्हीपॅटची) भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शकतत्त्वानुसार मोजणी करण्यात यावी.

**११.४** मतदार पडताळणी योगय कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या चिठ्ठ्यांविषयीचे प्रश्न : नियंत्रण युनिटामधून अभिरूप मतदानाची माहिती नष्ट न करणे किंवा मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी मधून अभिरूप मतदानाच्या चिठ्ठ्या काढून न टाकणे किंवा नियंत्रण युनिटमधील एकूण मतदान झालेली मते नमुना १७सी मधील नोंदविलेल्या मतांशी न जुळणे.

(क) पूर्व निश्चित प्रकरणे (मतदानाच्या दिवशी, पी+१ या दिवशी कागदपत्रांच्या छाननी दरम्यान इत्यादी), जेथे अभिरूप मतदान एक तर नियंत्रण युनिटमधून नष्ट केले गेलेले नाही किंवा अभिरूप मतदानाशी संबंधित मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या कागदी चिठ्ठ्या काढून टाकण्यात आलेल्या नाहीत (पूर्णतः किंवा अंशतः).

(ख) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या फेरीनिहीय मत मोजणी दरम्यान, जर असे कोणतेही प्रकरण असेल ज्यामध्ये नियंत्रण युनिटमध्ये मिळालेली एकूण मते नमुना १७-सी मधील नोंदलेल्या मतांशी जुळत नसतील, यातून हे सूचित होते की, क्लोज-रिझल्ट-क्लिअर (बंद-निकाल-रिकामा) करण्याची नियम प्रक्रिया अभिरूप मतदानादरम्यान प्रत्यक्ष मतदानादरम्यान या मतदान केंद्राच्या बाबतीत अचूकपणे झालेली नव्हती.

वरील प्रकरणांमध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल. अशा सर्व प्रकरणांमध्ये, नियंत्रण युनिट बाजूला ठेवण्यात येईल म्हणजेच, नियंत्रण युनिटच्या नियमित फेरीनिहाय मतमोजणी दरम्यान या मतदान केंद्रावरील मत मोजणीहाती घेतली जाणार नाही. या मतदान केंद्रांसाठी वाटप केलेले टेबल प्रस्तुत मतमोजणीच्या फेरी दरम्यान रिक्त ठेवण्यात येईल. पूर्व निश्चित मतदान केंद्रांची यादी मत मोजणीची प्रक्रिया प्रारंभ होण्यापूर्वी प्रतिस्पर्धी उमेदवारांना देण्यात येईल.

नियंत्रण युनिटच्या मतमोजणीच्या सर्व नियमित फेऱ्या संपल्यानंतर, पुढील कार्यपद्धती अनुसरण्यात यावी :

(एक) अशा सर्व मतदान केंद्रांवर मिळालेल्या एकूण मतांपेक्षा विजयाचे अंतर जास्त असल्यास, वर नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात आलेली ही मतदान केंद्रे मत मोजणीसाठी घेण्यात येणार नाहीत व या मतदान केंद्रांशिवाय रिझल्ट (निकाल) घोषित करण्यात येईल. संसदीय मतदारसंघातील निवडणुकीच्या बाबतीत, वर नमूद केल्याप्रमाणे सर्व मतदान केंद्रे जेथे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मतदान पडताळणीयोग्य कागदी परीनिरिक्षण निशाणी (व्हीव्हिपॅट) बाजूला ठेवण्यात आली आहेत. ती त्या संसदीय मतदारसंघाच्या सर्व विधानसभा मतदारसंघांमधील मतमोजणी पूर्ण होईपर्यंत, कोणत्याही विधानसभा प्रभागामधील मतमोजणीसाठी हाती घेण्यात येणार नाही.

(दोन) जर या मतदान केंद्रांवरील जिंकण्यातील अंतर हे समान किंवा एकूण झालेल्या मतदानापेक्षा कमी असेल, तर अशा प्रकरणात केवळ त्यासंबंधित मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या कागदी चिठ्ठ्यांची (व्हीव्हीपॅटचा) मोजणी करण्यात येईल व मतमोजणी प्रयोजनासाठी नियंत्रण युनिटे काढून टाकण्यात येतील म्हणजे मतमोजणीसाठी नियंत्रण युनिटांचा वापर केला जाणार नाही.

(तीन) अभिरुप मतदानाशी संबंधित मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्या (व्हीव्हीपीएटी) मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या ड्रॉप बॉक्समधून काढल्या गेल्या नसल्या तरीही, मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी चिठ्ठ्यांची मोजणी करण्यात येईल व मतदान झालेल्या उमेदवार निहाय मतांची योग्य गणना करण्यासाठी अभिरूप मतदान प्रमाणपत्रातून उमेदवारनिहाय मते वजा करण्यात येतील.

(चार) या सर्व मतदान केंद्रांचे मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या चिठ्ठ्यांचे मोजणी निकाल उमेदवारनिहाय मेळ घालून त्यात जोडून अंतिम निकाल तयार करण्यात येईल.

११.४.१ उमेदवारनिहाय मिळालेल्या मतांची अचूक मोजणी करण्यात काही विसंगती किंवा अडचण असल्यास, ते प्रकरण पुढील निदेशांसाठी भारत निवडणूक आयोगाकडे विचारार्थ पाठवण्यात येईल.

११.४.२ म्हणून, उपरोक्त प्रकरणांमध्ये, ती नियंत्रण युनिट (युनिटे) काढून टाकण्यात येईल (येतील) मतमोजणीसाठी वापरण्यात येणार नाहीत, ही मतदान केंद्रे मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणा कागदी चिठ्ठ्यां मोजणीच्या अनिवार्य पडताळणीसाठी ५(पाच) मतदान केंद्रांच्या यादृच्छिक निवडीतून वगळण्यात येतील.

## ११.५ नियम ५६ डी अन्वये उमेदवाराने मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांचा मोजणीची मागणी करणे.

निकालपत्रातील नोंदी जाहीर केल्यानंतर, कोणताही उमेदवार, त्यांचा निवडणूक प्रतिनिधी किंवा त्यांचे मतमोजणी प्रतिनिधीयांस, कोणत्याही किंवा सर्व मतदान केंद्रांवरील मुद्रित मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे लेखी स्वरुपात अर्ज करता येईल. असा अर्ज प्राप्त झाल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी जेथे मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांची मोजणी करावी किंवा कसे असा तोंडी आदेश काढील. जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कोणत्याही एक किंवा सर्व मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्या मोजणीची परवानगी देण्याचे

निश्चित केल्यास, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अशा निर्णयाची त्याच्या कारणांसह, नोंद करणे आवश्यक असेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पुढील गोष्टींचा योग्य विचार करावयास हवा :

११.५.१ त्या मतदान केंद्रावरील एकूण मतांची संख्या विजयी उमेदवार व मतमोजणीची मागणी करणारा उमेदवार यांच्यातील मतांच्या फरकापेक्षा जास्त किंवा कमी आहे किंवा कसे.

११.५.२ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये समस्या होती व मतदानादरम्यान त्या मतदान केंद्रावर ते बदलण्यात आले किंवा कसे.

११.५.३ मतदानादरम्यान त्या मतदान केंद्रावर मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी योग्य प्रकारे मुद्रित होत नसल्याबद्दल किंवा मतदाना दरम्यान त्या मतदान केंद्रामध्ये कोणत्याही मतदाराने नियम ४९ एम ए अन्वये कोणतीही तक्रार केली आहे किंवा कसे.

११.६ यादृच्छिकपणे निवडलेल्या (पाच) मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांची अनिवार्य पडताळणी.

११.६.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये नोंदविलेल्या मतांच्या शेवटची मोजणी फेरी पूर्ण झाल्यानंतर निवडणूक घेण्याबाबतचे नियम १९६१ च्या नियम ५६ डी च्या तरतुदीं खेरीज, प्रत्येक विधानसभा मतदारसंघ/प्रत्येक संसदीय मतदारसंघाच्या विधानसभा प्रभागातील यादृच्छिकपणे निवडलेल्या ०५ (पाच) मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांची अनिवार्य पडताळणी लोकसभा व राज्य विधानसभांच्या सर्व सर्वसाधारण व पोट निवडणुकांमध्ये आवर्जून करणे आवश्यक असेल.

११.६.२ मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांच्या अनिवार्य पडताळणीसाठी पुढील कार्यपद्धती अनुसरण्यात येईल :—

१. प्रत्येक विधानसभा मतदारसंघ/प्रभागातील ०५ (पाच) मतदान केंद्रांची यादृच्छिकपणे निवड संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवार/त्यांचे प्रतिनिधी व त्या मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या सर्वसाधारण निरीक्षकांच्या उपस्थितीत चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल.

२. चिठ्ठ्यांच्या सोडतीसाठी पुढील कार्यपद्धती अनुसरण्यात येईल :—

क) पोस्ट कार्डच्या आकाराचे पांढऱ्या रंगाचे कागदी कार्डाच्या चिठ्ठ्यांच्या सोडतीसाठी वापर करण्यात येईल.

ख) या कागदी पत्रावर विधानसभा मतदारसंघ/विधानसभा प्रभाग क्रमांक, विधानसभा मतदारसंघ/ विधानसभा प्रभागाचे नाव व मतदानाचा दिनांक वरच्या बाजूला व मतदान केंद्राचा क्रमांक मध्यभागी लिहिलेला असेल.

ग) चिठ्ठ्या काढण्यासाठी वापरण्यात येणारी कागदी कार्डे मतदान केंद्र क्रमांक दिसणार नाहीत अशा प्रकारे चार ठिकाणी दुमडलेली असावीत.

घ) प्रत्येक कार्डाची घडी करण्यापूर्वी व पात्रात टाकण्यापूर्वी उमेदवारांना/त्यांचे प्रतिनिधींना दाखविण्यात येईल.

ङ) कागदी कार्ड मोठ्या पात्रात ठेवण्यात यावेत व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने एक चिठ्ठी काढण्याआधी ते हलवणे आवश्यक असेल.

११.६.३ मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांची पडताळणी विशेषतः मतमोजणी कक्षाच्या आत या प्रयोजनासाठी तयार केलेल्या मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी मोजणी बुथमध्ये करण्यात येईल.

११.६.४ यादृच्छिकपणे निवडलेल्या पाच मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांची पडताळणी क्रमवार म्हणजेच एकामागून एक अशी करण्यात येईल.

११.६.५ नियंत्रण युनिटच्या इलेक्टॉनिक मोजणी दरम्यान व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी चिठ्ठ्यांचे हाताने मोजणी करताना काही विसंगती असण्याच्या बाबतीत, त्या विशिष्ट इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी चिठ्ठ्यांची पुनर्गणना जोपर्यंत ती इलेक्ट्रॉनिकमतदान यंत्राची मोजणी किंवा मागील मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी चिठ्ठ्यांपैकी एका संख्येशी जुळत नाही तोपर्यंत मोजण्यात येईल.

११.६.६ वरील परिच्छेद ११.६.५. मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची मोजणी व मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणीमध्ये काही विसंगत असल्यास, निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ५६ (डी) (४) (बी) नुसार, मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणीला प्राधान्य द्यावे. म्हणून, त्या मतदान केंद्राच्या बाबतीत नियंत्रण युनिटवर दर्शविलेल्या मतांची मोजणी व मुद्रित कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणी दरम्यान काही विसंगती असेल तर, मुद्रित कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणीनुसार निकाल पत्रात सुधारणा करण्यात यावी.

११.६.७ वरील सर्व प्रक्रियेचे पूर्णपणे व्हिडिओ चित्रण करणे आवश्यक असेल.

११.६.८ वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने प्रत्येक मतदान केंद्रासाठी खाली दिलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे द्यावे.

## यादृच्छिकपणे निवडलेल्या ०५ (पाच) मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांची अनिवार्य पडताळणी

राज्याचे नाव ..................................

विधानसभा/लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव :

विधानसभा प्रभागाचा (लोकसभा मतदारसंघाच्या बाबतीत) क्रमांक व नावः

मतदान केंद्राचा अनुक्रमांक व नाव

नियंत्रण युनिटाचा युनिक ओळख क्रमांक

मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीचा युनिक ओळख क्रमांक

**तक्ता १ : यादृच्छिकपणे निवडलेल्या पाच मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या कागदी चिठ्ठ्यांची पडताळणी.**

| अनु-क्रमांक | उमेदवाराचे नाव | टाकलेल्या मतांची संख्या | | काही विसंगती आढळल्या |
|---|---|---|---|---|
| | | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रा नुसार | कागदी चिठ्ठ्यांनुसार | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| | यापैकी कोणीही नाही | | | |
| | एकूण मते | | | |

मत मोजणी प्रतिनिधींची स्वाक्षरी

१.

२.

३.

मतमोजणी पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची स्वाक्षरी,

महा निरीक्षकाची स्वाक्षरी.

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, यादृच्छिकपणे निवडलेल्या पाच मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणीची अनिवार्य पडताळणी भारत निवडणूक आयोगाच्या अनुदेशांनुसार करण्यात आली आहे.

**११.७ मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या चिठ्ठ्यांच्या मोजणीचा क्रम :**

क) नियंत्रण युनिटच्या दर्शनी पॅनलवर ज्या मतदान केंद्रांचे निकाल दिसत नाही अशा मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या चिठ्ठ्या मोजण्यात येतील.

ख) अभिरूप मतदानाची माहिती/चिठ्ठ्या नष्ट न केल्यामुळे अभिरूप मतदानाच्या प्रक्रियेचे अयोग्य आयोजन झाल्यामुळे किंवा नियंत्रण युनिटमधील मतदान झालेली मते व नमुना १७ सी मधील मोजणीत विजोडता आल्यामुळे भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेश, अनुदेशांनुसार त्या मतदान केंद्रा (केंद्रां) च्या मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या चिठ्ठ्या मोजण्यात येतील.

ग) निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ चा नियम ५६ डी अन्वये, असल्यास, मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या चिठ्ठ्यांची मोजणी.

घ) प्रत्येक विधानसभा मतदारसंघ/संसदीय मतदारसंघाच्या प्रत्येक विधानसभा प्रभागासाठी यादृच्छिकपणे निवड ०५ मतदान केंद्रांच्या मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीच्या चिठ्ठ्यांची अनिवार्य पडताळणी करणे.

**१२. नमुना १७ सीच्या मोजणीच्या भाग दोन-निकाल पूर्ण करणे :**

१२.१ प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते व वरीलपैकी कोणीही नाही (नोटा) ची मते नियंत्रण युनिटच्या दर्शनी भागावर प्रदर्शित झाल्यावर मतमोजणी पर्यवेक्षक वर नमूद केल्याप्रमाणे नमुना १७-सी च्या मोजणीच्या भाग दोन-च्या निकालामध्ये प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात अशा मतांची संख्या स्वतंत्रपणे नोंदवील. त्या भागामध्ये दर्शविल्यानुसार एकूण मतांची संख्या त्या नमुन्याच्या भाग एक च्या बाब ६ समोर दर्शविलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा या दोन्हींच्या बेरजेशी मध्ये काही विसंगती आढळून आली का हे देखील नमुना १७-सी च्या भाग दोन मध्ये नमूद करील.

१२.२ मतमोजणी पर्यवेक्षकाला काही विसंगती दिसून आल्यास, कायद्यानुसार समूचित कार्यवाही करण्यासाठी तो/ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल. मतमोजणी प्रतिनिधी देखील उमेदवार किंवा त्याची/तिचा निवडणूक प्रतिनिधीच्या निदर्शनास आणून देईल त्यामुळे तो/ती त्याला वाटल्यास, त्या मुद्याविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करील.

१२.३ सर्व बाबतीत नमुना १७-सी चा भाग दोन पूर्ण केल्यानंतर, मतमोजणी पर्यवेक्षक त्यावर स्वाक्षरी करील. त्याला/तिला मतमोजणी टेबलावर उपस्थित असलेले उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींची देखील स्वाक्षरी घ्यावी लागेल.

१२.४ नमुना १७-सी जोडपत्र तीन मध्ये दिला आहे.

१२.५ फेरीनिहाय मतांची गणना करण्यासाठी नमुना १७-सी च्या भाग दोन ची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात येईल. भाग दोन ची दुसरी प्रत प्रत्येक टेबल वरून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने विशेषकरून पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडून गोळा करण्यात येईल. त्या त्या मतमोजणी टेबलावर उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधींना त्याच्या अभिलेखासाठी व पडताळणीसाठी त्याच्या छायांकित प्रती वितरित करण्यात येतील.

१२.६ मतमोजणी पर्यवेक्षकाने नमुना १७-सी चा भाग दोन व्यवस्थित भरल्यानंतर, त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर व उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींकडून स्वाक्षरी घेतल्यानंतर तो/ती तो नमुना(फॉर्म) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे तो पूर्णपणे भरला गेला आहे व सर्व बाबतीत पूर्ण आहे. याची त्याची/तिची पूर्ण खात्री पटल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी त्या नमुन्यावर प्रति-स्वाक्षरी करील. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अशी प्रतिस्वाक्षरी केलेला नमुना जो अंतिम निकाल संकलित करत आहे व नमुना २० मध्ये अंतिम निकालपत्र तयार करत आहे अशा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

**१३ अंतिम निकालपत्र तयार करणे :**

१३.१ नमुना २० मध्ये अंतिम निकाल संकलित करणारा व अंतिम निकालपत्र तयार करणारा प्रभारी अधिकारी, त्या नमुन्यामध्ये मतदान केंद्रानुसार प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते, प्रत्येक मतदान केंद्राच्या संदर्भात नमुना १७ सी च्या मोजणीच्या

भाग दोन मधील नोंदीनुसार काटेकोरपणे प्रत्येक उमेदवाराची मते दर्शविणाऱ्या त्या नमुन्यामध्ये नोंदी करेल. मतदान केंद्रावर प्रदत्त मतदान झाले असेल तर, त्या मतांची संख्या नमुना २० मधील उचित रकान्यामध्ये संबंधित मतदान केंद्राच्या समोर नोंदवील.

१३.२ प्रत्येक मतदान केंद्राच्या बाबतीत नमुना २० मध्ये केलेल्या नोंदी जाहीर करण्यात येतील जेणेकरून, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी प्रत्येक मतदान केंद्रातील मोजणीच्या निकालाची नोंद घेतील. विकल्पाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास नमुना २० मध्ये केलेल्या नोंदी आलटून पालटून दर्शनी फलकावर लिहिण्याची व्यवस्था करता येईल. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विना अडथळा इतर मतदान केंद्रावर मतमोजणी सुरू ठेवता येणे शक्य होईल.

## १४ फेरमोजणी :

१४.१ सामान्यपणे, मतदान यंत्रामध्ये नोंदविलेल्या मतांची फेरमोजणी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मतदान यंत्राद्वारे नोंदविलेले प्रत्येक मत हे वैध मत आहे व त्याच्या वैधतेबद्दल किंवा अन्यथा इतर कोणताही विवाद उद्भवणार नाही. फार तर जेव्हा नियंत्रण युनिट ही माहिती दाखवित असेल त्यावेळी एखाद्या विशिष्ट मतदान केंद्रावरील मतदानाचा निकाल काही उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या कडून उचितपणे नोंदविला गेला नसेल असे होऊ शकते. पुनःपडताळणीसाठी काही आवश्यकता उद्भवल्यास, तेव्हा त्या मतदान केंद्राच्या मतदानाचा निकाल ज्या मतदान यंत्रावर असेल त्याचे रिझल्ट "(निकाल)" बटन दाबताच ती माहिती नियंत्रण युनिटच्या दर्शनी पटलावर पुन्हा दिसून येईल.

१४.२ मतदान यंत्राच्या वापरामुळे फेर मोजणीची आवश्यकता पूर्णपणे संपुष्टात आली असली तरीही, निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ६३ मध्ये समाविष्ट असलेल्या मोजणीशी संबंधित तरतुदी मतदारसंघाच्या संदर्भात अद्यापही लागू आहेत.

१४.३ तदनुसार संपूर्ण मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अंतिम निकाल पत्रात (नमुना २०) नोंदवल्याप्रमाणे प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या एकूण मतांची संख्या देऊन निकाल जाहीर करतील. जाहीर केल्यानंतर, उमेदवार किंवा त्याच्या/तिच्या अनुपस्थितीत त्याच्या/तिचा निवडणूक प्रतिनिधी किंवा त्याचे/तिचे मतमोजणी प्रतिनिधी, सर्व किंवा कोणत्याही मतदान केंद्रावर त्याने/तिने ज्या कारणांवरून फेरमोजणीची मागणी केली आहे ती कारणे नमूद करून नोंदविलेल्या मतांच्या फेरमोजणीसाठी लेखी अर्ज करू शकतो.

१४.४ निकालपत्रात केलेल्या नोंदी जाहीर झाल्यानंतर, कोणताही उमेदवार किंवा त्याच्या/तिच्या अनुपस्थितीत त्याचा/तिचा निवडणूक प्रतिनिधी किंव त्याचे/तिचे मतमोजणी प्रतिनिधी, कोणतेही मतदान केंद्र किंवा मतदान केंद्राच्या बाबतीतील मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी मधील मुद्रित कागदी चिठ्ठ्यांची मोजणी करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करू शकतील. निवडणूक निर्णय अधिकारी भारत निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे, निवडणूक घेण्याबाबचे नियम याच्या नियम ५६डी मध्ये तरतूद केल्याप्रमाणे या बाबतचा निर्णय घेऊ शकतो.

१४.५ या प्रयोजनार्थ, निवडणूक निर्णय अधिकारी फेरमोजणीसाठी लेखी अर्ज करण्याचा नेमका तास व मिनिट जाहीर करील तो पर्यंत त्याला/तिला अर्ज प्राप्त होण्याची वाट पाहावी लागेल. फेरमोजणीसाठी असा अर्ज केल्यानंतर, फेरमोजणीसाठीची कारणे विचारात घेतली जातील व निवडणूक निर्णय अधिकारी त्यावर निर्णय घेईल. असाअर्ज वाजवी असेल तर तो/ती त्यास संपूर्ण किंवा अशतः परवाना देऊ शकतो, किंवा क्षुल्लक किंवा अवाजवी वाटल्यास, तो/ती पूर्णपणे नाकारू शकतो. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल. कोणत्याही परिस्थितीत, पूर्णतः/अंशतः फेरमोजणीसाठी अर्जाला परवानगी असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी पुन्हा मतमोजणी करण्याचे निदेश देईल. जर त्यांची फेरमोजणी करण्याची विनंती करण्यात आली असेल व अशा विनंतीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने परवानगी दिली असेल तर टपाली मतपत्रिकांची देखील फेरमोजणी करता येईल. अशी फेरमोजणी पूर्ण झाल्यानंतर, आवश्यक त्या मर्यादेपर्यंत निकालपत्रात सुधारणा करण्यात येईल व त्यानुसार सुधारित घोषणा करण्यात येईल. प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांची एकूण संख्या जाहीर झाल्यानंतर निकालपत्र पूर्ण करून त्यावर स्वाक्षरी करण्यात येईल.

१४.६ निकालपत्र पूर्ण करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर उमेदवार किंवा त्याचा/तिचा निवडणूक प्रतिनिधी किंवा त्याच्या/तिच्या कोणताही मतमोजणी प्रतिनिधीला फेरमोजणीची मागणी करण्याचा हक्क असणार नाही याची नोंद घ्यावी. निकालपत्र पूर्ण करून त्यावर स्वाक्षरी झाल्यानंतर फेर मत मोजणी करिता केलेली कोणतीही मागणी नाकारण्यात येईल.

१४.७ जर एखाद्या लोकसभा मतदारसंघातील मतांची एकापेक्षा जास्त ठिकाणी मोजणी झाली असेल तर, निवडणूक घेण्याबाबतचे नियम १९६१ च्या नियम ६५ अनुसार, त्या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी मोजणीच्या शेवटीच मतांच्या फेरमोजणीची मोजणी करता येईल. असे शेवटचे ठिकाण म्हणजे सर्वसाधारणपणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची मुख्यालये असावीत, जेथे तो/ती लोकसभा मतदारसंघातील विविध विधानसभा प्रभागांचे निकाल गोळा करतील व एकत्रित करतील.

## १५. नव्याने मतदान झाल्यास मतमोजणीची स्थगिती :

१५.१ पूर्वगामी परिच्छेदामध्ये नमूद केलेली कोणतीही पावले उचलण्यापूर्वी, निवडणूक निर्णय अधिकारी पूर्वी नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही मतदानयंत्रात छेडछाड झाल्याचे आढळून आल्याने त्याने/तिने याबाबत अहवाल दिला असेल तर, भारत निवडणूक आयोगाच्या निदेशांसाठी वाट पाहील. जेथे बाधित मतदान केंद्रा( केंद्रा) वर पुन्हा नव्याने तदान करण्याचे निदेश भारत निवडणूक आयोगाने दिले असतील तर, इतर सर्व मतदान केंद्रांवरील मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतमोजणी स्थगित केली जाईल. अशा प्रकरणामध्ये सर्व मतदानयंत्रे तसेच निवडणुकीशी संबंधित इतर सर्व कागदपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी सीलबंद करील. प्रत्येक उमेदवार किंवा त्याचा/तिचा प्रतिनिधी, त्याला/तिला प्रत्येक मतदान यंत्र व लिफाफा इत्यांदींवर त्याचा/तिचा शिक्का उमटवण्याची इच्छा असेल तर, तसे करण्यास परवानगी दिली जाईल. अशा प्रकारे स्थगित केलेली मत मोजणी नवीन मतदान झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने या संदर्भात निश्चित केलेल्या दिनांकास व वेळी मतमोजणी पुन्हा सुरू करण्यात येईल व वर विहित केलेल्या प्रक्रियेनुसार पूर्ण केली जाईल.

१५.२ जर त्यांच्या बहुसंख्य मतदान केंद्रांवर मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या घटना घडल्या असतील किंवा मतमोजणी केंद्रावर किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र किंवा टपाली मतपत्रिका अवैधरीतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या ताब्यातून काढून घेण्यात आल्या असतील किंवा अचानकपणे किंवा हतूपूर्वक नष्ट केल्या असतील किंवा गहाळ झाल्या असतील किंवा त्यांना पोचवली असेल किंवा त्या छेडछाड केली असेल तर, निवडणूका घेताना त्यावर लक्ष ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या निरीक्षकांना, निकाल जाहीर करण्यापूर्वी, कोणत्याही वेळी, मतमोजणी थांबविण्याचा किंवा निकाल जाहीर न करण्याचा/निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला निदेश देण्याचा अधिकार असेल. अशा प्रकरणांमध्ये निवडणुकीची कार्यवाही निरीक्षकांच्या अहवालावर व सर्व महत्वपूर्ण परिस्थिती विचार घेतल्यानंतर भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

## १६. मतमोजणी नंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी पुन्हा सीलबंद करणे.

१६.१ नियंत्रण युनिटमध्ये नोंदवलेल्या मतदानाचा निकाल उमेदवार निहाय निश्चित केल्यानंतर व नमुना १७ सीच्या 'मोजणीचा निकाल-भाग दोन' मध्ये व नमुना २० मधील अंतिम निकालपत्रामध्ये नोंदवल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी त्याच्या/तिच्या शिक्क्यासह व तेथील उमेदवार किंवा त्यांचे उपस्थित निवडणूक प्रतिनिधी ज्यांना त्यांचा शिक्का त्यावर उमटवायचा आहे त्यामुळे युनिटमध्ये नोंदवलेल्या मतदानाचा निकाल पुसून टाकला जाणार नाही व युनिटमध्यो अशा निकालाच्या स्मृती तशीच राहील यासाठी पुन्हा शिक्का उमटवतील तसेच, भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणाच्या कागदी चिठ्ठ्या त्याच पद्धतीने सीलबंद करण्यात नियंत्रण युनिटचे वर उल्लेखिल्याप्रमाणे पुन्हा सीलबंद करण्यासाठी खालील पद्धत वापरण्यात यावी :

क. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या निकाल विभागाचे बाह्य वेष्टन पुन्हा बंद करून पुन्हा सीलबंद करावे.

ख. असे पुन्हा सीलबंद केलेले नियंत्रण युनिट पुन्हा त्याच्या वहन पेटीमध्ये ठेवण्यात यावे.

ग. वहनपेटी पुन्हा सिलबंद करण्यात यावी.

घ. निवडणुकीच्या तपशील, मतदारसंघाचे नाव, ज्या मतदान केंद्रावर नियंत्रण युनिट वापरले गेले त्याचा तपशील नियंत्रण युनिटचा अनुक्रमांक, मतदानाचा दिनांक, मत मोजणीचा दिनांक असलेली पत्ता खूणचिठ्ठी (ॲड्रेस टॅग) वहन पेटीच्या हँडलला घट्ट जोडलेली असावी.

ङ जर उमेदवार/त्यांचे निवडणूक प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधींची इच्छा असेल तर, त्यांना देखील मतदान यंत्रावर त्याचे सील जोडल्यास परवानगी द्यावी. उमेदवारांच्या हितासाठी मतमोजणी प्रतिनिधींनी जे कोणासाठी प्रतिनिधीत्व करत आहेत त्यांनी त्या यंत्रांवर त्यांचे सील जोडल्याची सुनिश्चिती करावी असा त्यांना सल्ला देण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या उमेदवारांची खात्री पटेल की, त्यात नोंदवलेल्या मतांशी छेडछाड होण्याची शक्यता नाही. तथापि, जेथे उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने असे सील लावले असेल, तेथे मतमोजणी प्रतिनिधीनी त्यांचे स्वतंत्र सील लावण्याची आवश्यकता नाही.

**१६.२ मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणींमधून मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी चिठ्ठ्या काढून टाकणे :**

निकाल जाहीर झाल्यानंतर, त्या चिठ्ठ्या मोजल्या गेल्या आहेत की नाही हे विचारात न घेता मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी ड्रॉप बॉक्स मधून मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण कागदी चिठ्ठ्या काढून घेण्यात येतील व त्या चिठ्ठ्या मतदान केंद्रनिहाय जाड काळ्या पाकिटात घालून ठेवण्यात येतील. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देण्यात आलेल्या भारत निवडणूक आयोगाच्या द्विभाषिक गुप्त सीलसह लाख वापरून ते सीलबंद केले जाईल. उमेदवारांना/त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना त्या प्रक्रियांचा साक्षीदार होण्याचा परवानगी असेल व प्रत्येक पाकिटावर त्यांची स्वाक्षरी देखील घेण्यात येईल.

## वारंवार विचारले जाणारे प्रश्न

**१. मतमोजणी प्रतिनिधींना कोण नियुक्त करते व मतमोजणी प्रतिनिधी नेमण्याची पद्धत काय आहे ?**

उत्तर : नमुना १८ मध्ये उमेदवार किंवा त्याच्या/ तिच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती केली जाते व नमुना १८ मधील घोषणापत्रावर मतदान प्रतिनिधीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या उपस्थितीत स्वाक्षरी करावी.

**२. उमेदवाराकडून किती मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त केले जाऊ शकतात ?**

उत्तर : प्रत्येक उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला मतमोजणी टेबलच्या संख्येइतके मतमोजणी प्रतिनिधी व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या टेबलसाठी आणखी एक मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्याची परवानगी असेल.

**३. मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यासाठी कोण पात्र असेल ?**

उत्तर : भारताची नागरीक असलेली व १८ वर्षांपेक्षा अधिक वयाची असलेली कोणतीही व्यक्ती मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त केली जाऊ शकते. तथापि, केंद्र, सरकार किंवा राज्य शासनाचे विद्यमान मंत्री, केंद्र सरकार किंवा राज्य विधानसभेचे सदस्य, महानगरपालिकेचे महापौर किंवा नगरपालिका/ जिल्हा परिषद/ पंचायत संघ इत्यादीचे अध्यक्ष, केंद्रीय सार्वजनिक उपक्रम/राज्य सार्वजनिक उपक्रम, शासकीय संस्था/ महामंडळाचे अध्यक्ष व सदस्य, शासनाकडून कोणतेही मानधन मिळत असलेली कोणतीही व्यक्ती किंवा शासकीय/शासन सहाय्यित संस्थांमध्ये अर्धवेळ काम करणाऱ्या व्यक्ती, शासकीय/शासन सहाय्यित संस्थामध्ये काम करणारे रूग्णसेवक/ आरोग्य कर्मचारी रास्त धान्य दुकानाचे विक्रेते, अंगणवाडी कर्मचारी, शासकीय सेवेत असलेली व्यक्ती [लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३४ क अन्वये हा अपराध आहे व अशा नियुक्त व्यक्ती ३ (तीन) महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस, किंव दोन्ही शिक्षांस पात्र होतील.] मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यासाठी पात्र असणार नाही.

**४. मतमोजणी प्रतिनिधीने मतमोजणी कक्षात प्रवेश करण्यासाठी कोणत्या पूर्वावश्यकता आहेत ?**

उत्तर : मतमोजणीच्या दिवशी, मतमोजणी कक्षामध्ये प्रवेश करण्यासाठी मतमोजणी प्रतिनिधीने खालील गोष्टी सादर केल्या पाहिजेत.

(एक) नमुना -१८ ची एक प्रत

(दोन) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने यथोचितरीत्या स्वाक्षरी केलेले शिक्का उमटवलेले त्याचे छायाचित्र असलेले ओळखपत्र.

**५. उमेदवार/ उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधीकडून नमुना मध्ये एकदा नियुक्तीपत्र दिल्यानंतर, मतमोजणी प्रतिनिधी (प्रतिनिधींमध्ये) बदल किंवा रद्द केले जाऊ शकते का ?**

उत्तर : मतमोजणी सुरू होण्यापूर्वी कोणत्याही वेळी नमुना १९ मध्ये विनंती करून उमेदवार किंवा त्याचा/तिचा निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करण्यास स्वतंत्र असेल. त्या बदलीची नियुक्ती नमुना १८ मध्ये भरून मतमोजणी सुरू होण्यापूर्वी कोणत्याही वेळी करता येऊ शकते.

**६. मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी प्रतिनिधीने मतमोजणी कक्षात कधी पोहचावयास हवे ?**

उत्तर : मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या वेळेच्या किमान एक तास आधी मतमोजणी प्रतिनिधीने कक्षाबाहेर पोहचावयास हवे.

**७. मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणी कक्षामध्ये सोबत कोणते साहित्य घेऊन जाऊ शकतो ?**

उत्तर : पेन/पेन्सिल, कोरे कागद/नोंद घेण्यासाठी वही, मतदान संपल्यानंतर निवडणूक प्रतिनिधीकडून मिळालेली नमुना १७ सी ची दुबार प्रत मतमोजणी दरम्यान वापरण्यास मतमोजणी कक्षामध्ये नेण्यास परवानगी आहे. भ्रमणध्वनी किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक ध्वनिमुद्रण यंत्र मतमोजणी कक्षाच्या आत नेण्यास परवानगी देता येणार नाही. पिण्याचे पाणी, अल्पोपाहार, प्रसाधनगृह इत्यादीसाठीच्या वाजवी सुविधा मतमोजणी कक्षा जवळच उपलब्ध करून दिल्या जातील.

**८. मतमोजणी प्रक्रियेदरम्यान मतमोजणी प्रतिनिधीच्या हालचालीस कोणते निर्बंध आहेत ?**

उत्तर : सर्वसाधारणपणे मतमोजणी प्रक्रियेदरम्यान मतमोजणी कक्षातून बाहेर जाण्यास मतमोजणी प्रतिनिधीला परवानगी असणार नाही. त्यांना नेमून दिलेल्या टेबलावरच त्यांनी बसून राहणे अपेक्षित असेल तसेच संपूर्ण कक्षामध्ये इकडून तिकडे फिरण्यास त्यांना परवानगी असणार नाही.

**९. नमुना १३ ए मध्ये मतदारांच्या घोषणेवर साक्षांकन अधिकाऱ्यांने त्याने/तिने आपला शिक्का उमटवला नाही या आधारावर टपाली मतपत्रिका नाकारली जाऊ शकते का ?**

उत्तर :

(एक) जर साक्षांकन अधिकाऱ्याने त्या नमुन्यावर त्याचे/ तिचे नाव व पदनामाशी संबंधित सर्व तपशील दिलेले असतील तर टपाली मतपत्रिका, केवळ नमुना १३ ए मध्ये मतदान घोषणेवर त्याचा/तिचा शिक्का न उमटवल्याच्या कारणास्तव नाकारली जाणार नाही.

(दोन) जर पाठविणाऱ्याची ओळख नमुना १३ ए मधील त्याच्या/तिच्या घोषणेच्या आधारावर पडताळणी करण्यायोग्य असेल तर, त्याने/तिने टपाली मतपत्रिका ज्या बाह्य वेष्टन "बी" (नमुना १३ सी)त पाठविली आहे त्यावर त्याची/ तिची स्वाक्षरी नसल्यास केवळ त्या आधारावर पाठविणाऱ्या (मतदारा) ची टपाल मतपत्रिका नाकारली जाणार नाही.

**१०. टपाली मतपत्रिकेवर त्याचे/ तिचे मत दर्शविण्यासाठी मतदार कायद्याने त्यावर कोणतेही विशिष्ट चिन्ह असणे आवश्यक आहे का ?**

उत्तर : टपाली मतपत्रिकेवर त्याचे/ तिचे मत दर्शविण्यासाठी मतदाराने त्यावर कोणतेही विशिष्ट चिन्ह असणे आवश्यक नाही. मतदाराचा हेतू स्पष्ट असल्यास कोणतेही चिन्ह वैध म्हणून स्वीकारले जाऊ शकते.

**११. टपाली मतपत्रिकांच्या फेटाळलेल्या संख्येपेक्षा विजयाचे अंतर कमी असल्यास अशा प्रकरणांमध्ये प्रमाणित कार्यचालन पद्धत काय आहे ?**

उत्तर : मतमोजणीच्या वेळी अवैध म्हणून नाकारण्यात आलेल्या टपाली मतपत्रिकांच्या संख्येपेक्षा विजयाचे अंतर कमी असेल तर, बहुसंख्य सावधगिरीचे उपाय म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नाकारलेल्या सर्व टपाली मतपत्रिका नाकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता याची खात्री करण्यासाठी वैयक्तिकरित्या योग्य पडताळणी करावी.

**१२. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची मोजणी केव्हा सुरू करता येईल ?**

उत्तर : टपाली मतपत्रिकांची मोजणी सुरू झाल्यानंतर ३० मिनिटांनंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची मतमोजणी सुरू होऊ शकते ?

**१३. मतमोजणी प्रतिनिधी वहन पेटी व नियंत्रण युनिटमधील कागदी मोहर/खूण चिठ्ठी ची कशी पडताळणी करू शकतो ?**

उत्तर : कोणत्याही मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटमध्ये नोंदविलेल्या त्या मतांची मोजणी करण्यापूर्वी, मतमोजणी टेबलावर उपस्थित असलेले उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी किंवा त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी, त्याची स्वतःची खात्री पटण्यासाठी, वहन पेटी व नियंत्रण युनिटवर चिकटवलेल्या कागदी मोहोर, विशेष खूणचिठ्ठी इतर महत्त्वाच्या मोहोर मतमोजणी कर्मचाऱ्याला वाचण्यास/ दाखविण्यास सांगू शकतात.

**१४. मतमोजणी प्रतिनिधी मुद्रित मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी चिठ्ठ्यांच्या मोजणीसाठी विनंती करू शकतो का ? प्रक्रिया काय आहे ?**

उत्तर : निकालपत्रातील नोंदीची घोषणा झाल्यानंतर, कोणताही उमेदवार, त्यांचा निवडणूक प्रतिनिधी किंवा त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी, कोणत्याही किंवा सर्व मतदान केंद्रामधील मुद्रित मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणीसाठी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करू शकतो. असा अर्ज प्राप्त झाला तर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्या मोजल्या जाव्यात

अथवा नाही. यावर मौखिक आदेश द्यावा. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कोणत्याही एका किंवा सर्व मतदान केंद्रावरील मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी कागदी चिठ्ठ्या मोजण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा असा निर्णय त्याच्या कारणांसह लेखी स्वरूपात नोंदविला जावा.

**१५. मतमोजणी कर्मचाऱ्यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामधील मिळालेल्या मतांची मोजणी सुरू केल्यानंतर मतमोजणी प्रतिनिधींची भूमिका काय असेल ?**

उत्तर : मतदान केंद्राध्यक्षाकडून निवडणूक प्रतिनिधीला प्राप्त झालेली नमुना १७ सी ची दुबार प्रत मतमोजणी प्रतिनिधीला मिळालेली असते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामधील मतांच्या मोजणी दरम्यान, मतमोजणी प्रतिनिधी नमुना १७ सी चा भाग दोन भरू शकतो ज्यात मतदान झालेल्या मतांच्या नोंदी आहेत. उपरोक्त तपशील त्याला/तिला मतमोजणी प्रक्रियेचा मागोवा घेण्यास साहाय्यभूत ठरेल व अपक्ष उमेदवारांना मिळालेल्या मते त्याबरोबरच वरीलपैकी कोणीही नाहीची (नोटा)मते यांच्या बेरजेसह इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील मतांशी त्याला मेळ बसविता येईल, मतमोजणी कर्मचाऱ्याकडून १७ सी च्या भाग दोन ची भरलेली प्रत मिळण्यासाठी मतमोजणी प्रतिनिधी देखील पात्र असेल.

# जोडपत्र

## जोडपत्र एक : मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती व घोषणा [नमुना १८]
## निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ (नियम ५२ (२) पहा)

मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती

.................................... मतदारसंघातून ...................... निवडणूक

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी.

मी, ........................* वरील निवडणूकीत उमेदवार ..............याचा उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी म्हणून येथे मतमोजणीला उपस्थित राहण्यासाठी, याद्वारे खालील व्यक्तींना माझे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करीत आहे :–

| मतमोजणी प्रतिनिधीचे नाव | मतमोजणी प्रतिनिधीचा पत्ता |
|---|---|
| १ | |
| २ | |
| ३ | |
| इत्यादी | |

आम्ही असे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यास तयार आहोत. उमेदवार/निवडणूक प्रतिनिधीची स्वाक्षरी.

१.

२.

३.

इत्यादी

ठिकाण ............................

दिनांक ............................

मतमोजणी प्रतनिधीची स्वाक्षरी.

(शा.म.मु.) वाय २५३०-६ (३,०००—२-२०२४)

## मतमोजणी प्रतिनिधींचे घोषणापत्र

**(निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर स्वाक्षरी करावयाचे)**

आम्ही याद्वारे घोषित करतो की, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२८ द्वारे मनाई केलेले जे आम्ही वाचले आहे/आम्हाला वाचून दाखविण्यात आले आहे असे काहीही आम्ही या निवडणुकीत करणार नाही.

१.

२.

३.

दिनांक ................................

माझ्यासमोर स्वाक्षरी केली

दिनांक ...................................                    मतमोजणी प्रतिनिधींची स्वाक्षरी

निवडणूक निर्णय अधिकारी.

---

* अनुसूचित पर्याय खोडा.

** लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १२८.—

**१२८. मतदान गुप्त राखणे.**

(१) जो निवडणुकीच्यावेळी मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्यासंबंधात काही काम करतो असा प्रत्येक अधिकारी, लिपिक किंवा अन्य इसम याला मतदान गुप्त राखावे लागेल, तसेच ते राखण्यास मदत करावी लागेल आणि (कोणत्याही कायद्यानुसार किंवा त्या खाली काही प्रयोजनासाठी अधिकृत केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही), ज्यामुळे अशी गुप्तता भंग पावेल असे मानण्याजोगी कोणतीही माहिती, कोणत्याही व्यक्तीला सांगता येणार नाही.

(२) जी व्यक्ती, पोट-कलम (१) मधील उपबंधांचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

## जोडपत्र दोन : मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती रद्द करणे

**(नमुना १९)**

**निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ (नियम ५२ (४) पहा)**

**मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करणे**

........................................... * ची निवडणूक

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी.

मी, ........................................................................... वरील निवडणुकीतील ................................................... उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी माझा/त्याचा मतमोजणी प्रतिनिधी ........................................................... ची नियुक्ती रद्द करीत आहे.

रद्द करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी

* येथे खालीलपैकी एक पर्याय योग्य असेल तो समाविष्ट करा :

(१) मतदारसंघातील लोकसभा

(२) मतदारसंघातील विधानसभा

(३) राज्यसभा राज्य विधानसभा

(४) ....................................... (संघ राज्यक्षेत्रा) च्या निर्वाचक गणाकडून निवडून आलेल्या सदस्यांद्वारे राज्यसभा.

(५) .................................... विधानसभेच्या सदस्यांद्वारे विधानपरिषद

(६) मतदारसंघातील विधानपरिषद

**टीप :** आवश्यकतेनुसार शब्द वगळा

## जोडपत्र तीन : नोंदविलेल्या मतांचा हिशेब व मतमोजणीचा निकाल

**(नमुना १७ सी)**

**निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ (नियम ४९ एस व ५६ सी(२) पहा)**

**भाग एक – नोंदविलेल्या मतांचा हिशेब**

नियंत्रण युनिट .................

मतदान युनिट ..................

मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी ...........................

१. मतदान केंद्रावर नेमून दिलेल्या मतदारांची एकूण संख्या

२. मतदार नोंदवही (नमुना १७ए) मध्ये नोंदविलेल्या मतदारांची एकूण संख्या

३. नियम ४९-ओ नुसार मत नोंदवायचे नाही असे ठरविणाऱ्या मतदारांची संख्या

४. नियम ४९ एम नुसार मतदान करण्यास परवानगी नसलेल्या मतदारांची संख्या

५. नियम ४९ एम ए नुसार नोंदविलेली चाचणी मते वजा करणे आवश्यक आहे

(क) वजा करावयाच्या चाचणी मतांची एकूण संख्या :

एकूण क्रमांक नमुना १७ ए मधील मतदार (मतदारांचे) अनुक्रमांक

(ख) उमेदवार : .......................... ज्यांच्यासाठी चाचणी मत (मते) टाकली आहेत

| अनुक्रमांक | उमेदवाराचे नाव | मतांची संख्या |
|---|---|---|

६. मतदान यंत्रानुसार नोंदविलेल्या मतांची एकूण संख्या ................

७. बाब ६ समोर दर्शविलेल्या मतांची एकूण संख्या बाब २ समोर दर्शविलेल्या मताच्या एकूण संख्येशी जुळले पाहिजेत वजा बाब ३ मत न देण्याचा निर्णय घेतलेल्या मतदारांची संख्या वजा बाब ४ समोरील मतदारांची संख्या म्हणजेच (२-३-४) किंवा कोणतीही निदर्शनास आलेली विसंगती : ....................................

८. नियम ४९पी नुसार प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदारांची संख्या :

९. प्रदत्त मतपत्रिकांची संख्या :

(क) वापरासाठी प्राप्त झाल्या ..........................

(ख) मतदारांना दिल्या ..................................

(ग) न वापरता परत केल्या .............................

अनुक्रमांक

......................

एकूण .......... पासून ते ..........

१०. कागदी मोहरांचा हिशेब

१. वापरण्यासाठी पुरविण्यात आलेल्या कागदी मोहोरा :

२. वापरलेल्या कागदी मोहोरा :

एकूण क्रमांक ..................

अनुक्रमांक .................. ते ...................... पर्यंत

एकूण संख्या ...................

अनुक्रमांक ................. ते ....................... पर्यंत

मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी

१. ................................

२. .................................

३. न वापरता निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे परत करण्यात आलेल्या कागदी मोहोरा : एकूण संख्या ...................

अनुक्रमांक ................. ते ................... पर्यंत

३. कागदी मोहोरा, फाटलेल्या/खराब असल्यास :

दिनांक .........................

ठिकाण ..............................

एकूण संख्या .........................

अनुक्रमांक ................... ते ....................... पर्यंत

४. ...........................

५. ............................

६. ............................

उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी/मतमोजणी प्रतिनिधी

पूर्ण स्वाक्षरी

१.

२.

३.

४.

५.

६.

७.

ठिकाण .........................

दिनांक .........................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची स्वाक्षरी

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी मतदान केंद्र क्रमांक .............................

**भाग दोन : मतमोजणीचा निकाल**

| उमेदवाराचा अनुक्रमांक | उमेदवाराचे नाव | नियंत्रण युनिटवर दर्शविलेल्या मतांची संख्या | भाग एक च्या बाब ५ नुसार वजा करावयाच्या चाचणी मतांची संख्या | वैध मतांची संख्या (३-४) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| **एकूण** | | | | |

भाग एकच्या बाब ६ समोर दर्शविलेल्या एकूण मतांच्या संख्येवर दर्शविलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा दोन बेरजेमध्ये कोणती तफावत आढळून आली आहे किंवा कसे.

ठिकाण ..............................

दिनांक ..............................

मतमोजणी पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

पूर्ण स्वाक्षरी

उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी/मतमोजणी प्रतिनिधीचे नाव

पूर्ण स्वाक्षरी

१.

२.

३.

४.

५.

६.

७.

ठिकाण ..............................

दिनांक ..............................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची स्वाक्षरी

पूर्ण स्वाक्षरी.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई




भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोक रोड, नवी दिल्ली ११० ००१

" मजबूत लोकशाहीसाठी व्यापक सहभाग "